



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. २९ नोव्हेंबर २०२५






मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ०१८ | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# लाडकी बहीण योजना बंद होणार नाही

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा विरोधकांना टोला

**मंचर: (समर्थ गांवकरी)**

शहरात नगरपंचायत अस्तित्वात आल्यानंतर लगेचच 105 कोटी रुपयांचा निधी दिला. नगरपंचायत जिंकल्यावर किती पैसे देणार याचा विचार करा. काहीजण बोलले निधीचा महापूर येणार. पैसे माझ्याकडून आले मात्र नाव त्यांचे, आईजीच्या जीवावर बाईजी उदार असा टोला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना लगावला. लाडकी बहीण योजना बंद करण्याचा प्रयत्न झाला पण त्यांची थोबाड बंद झाली आहेत. कोणीही माईका लाल आला तरी ही योजना बंद होणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले.



मंचर नगरपंचायत निवडणुकीतील शिवसेना उमेदवारांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांची जाहीर सभा झाली त्यावेळी बोलताना ते म्हणाले, मुख्यमंत्री असताना अनेक योजना केल्या मात्र सगळ्यात आवडती योजना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आहे. लाडक्या बहिणींनी राज्यात सत्ता आणली. आताही महिलांची उपस्थिती पाहता विजय पक्का आहे. लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही. लाडक्या बहिणीचे राज्य आणायचा आहे असे सांगून ते म्हणाले एकनाथ शिंदे पोकळ गप्पा मारत नाही अथवा आश्वासन देत नाही. एकदा कमिटमेंट केली की ती पूर्ण करतो. ऑन द स्पॉट डिसिजन घेतो. होणार असेल तर काम करणारच. मंचर शहरासाठी भरीव निधी दिला जाईल. 133 कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना तात्काळ मंजूर करू असा शब्द त्यांनी दिला.

बिबट्याचा प्रश्न सोडवला जाईल असे सांगून ते म्हणाले, लाडक्या बहिणी, भाऊ व शेतकऱ्यांसाठी अनेक योजना आणल्या आहेत. शहराचा रोड मॅप तयार आहे. चांगले सुंदर शहर झाले पाहिजे. वाहतूक कोंडी दूर झाली पाहिजे त्यासाठी शिवसेनेच्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

## थोडक्यात...

### बुलडाण्याच्या तरुणाने जीवन संपवलं

**पुणे (समर्थ गांवकरी) :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या एका 26 वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी (ता. 28) घडली. सागर सुभाष पवार (वय 26, रा. सदाशिव पेठ) असे त्या तरुणाचे नाव आहे. सागर हा मूळचा बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर येथील मिलिंदनगरमधील रहिवासी आहे. तो एमपीएससीची तयारी करण्यासाठी पुण्यात वास्तव्यास होता. मागील दोन महिन्यांपासून तो सदाशिव पेठ परिसरात राहत होता. स्पर्धा परीक्षेचा ताण आणि नैराश्यातून त्याने आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला. पूना हॉस्पिटलसमोर राहत्या घरात सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास तरुणाचा मृतदेह आढळल्याची माहिती पोलिस नियंत्रण कक्षात मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह वैद्यकीय तपासणीसाठी ससून रुग्णालयात पाठवला आहे. या प्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# कारवायांसाठी आधार कार्डचा वापर

## पुण्यात ८० वर्षांच्या वृद्धाकडून २० लाख उकळले



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आम्ही एका दहशतवादी संघटनेच्या चेअरमनला पकडले आहे. त्याने 247 लोकांची नावे दिली आहेत. त्यामध्ये तुमचे नाव आहे. तुमचे आधार कार्ड दहशतवादी कृत्य आणि मनीलॉन्ड्रींगमध्ये वापरले आहे, असा धाक दाखवत सायबर ठगांनी पाषाणमधील 80 वर्षीय ज्येष्ठाकडून 20 लाख 65 हजार रुपये उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी, फसवणूक झालेल्या ज्येष्ठाने चतुःश्रृंगी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी सायबर ठगाच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी ज्येष्ठाला सायबर ठगाने पोलिस गणवेश परिधान करून व्हिडीओ कॉल केला. त्याने सायबर क्राईम कुलाबा येथून बोलत असल्याचे सांगितले. तुमच्या फोनवरून अश्लील मेसेज पाठवले आहेत. त्याची तक्रार आमच्याकडे आली आहे, असे सांगितले. त्यानंतर फिर्यादींना तुमचे आधार कार्ड, मनीलॉन्ड्रींग आणि दहशतवादी कृत्यासाठी वापरला आहे. एका दहशतवादी संघटनेच्या चेअरमनला आम्ही पकडले आहे. त्याने दिलेल्या यादीत तुमच्या नावाचा समावेश आहे. त्याने सांगितले की, या यादीतील लोकांना मी दहा टक्के पैसे दिले आहेत. तुमच्या बँक खात्यात असे अडीच कोटी रुपये आले आहेत. त्यामुळे अटक करावी लागेल, अशी सायबर ठगाने फिर्यादींना भीती दाखवली. त्यानंतर विविध तपासणीच्या नावाखाली आणि अटक न करण्यासाठी फिर्यादींकडून 20 लाख 65 हजार रुपये सायबर ठगांनी उकळल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# निवडणुकांना स्थगिती नाहीच

## ठरलेल्या वेळेतच निवडणुका होणार; सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**नवी दिल्ली/मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत 50 टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याच्या आक्षेपावर आज सर्वोच्च न्यायालयात पुन्हा सुनावणी झाली आहे. याकडं संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं होतं.



महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात सुरू असलेल्या आरक्षणाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणारच, असं न्यायालयानं सांगितलं आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता २१ जानेवारीला होणार आहे. म्हणजे, निवडणुका झाल्यानंतर न्यायालय यावर अंतिम निर्णय देईल. न्यायालयानं निवडणुकांना परवानगी दिली असली तरी एक मोठी अट घातली आहे. पुढील निवडणुकांमध्ये कोणत्याही परिस्थितीत आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त होता कामा नये. लोकशाही प्रक्रिया सुरू राहणे महत्त्वाचे आहे, त्यामुळे निवडणुका थांबवल्या जाणार नाहीत.

नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका अधिसूचित वेळापत्रकानुसार घेण्यास सर्वोच्च न्यायालयानं परवानगी दिली आहे. याचाच अर्थ कोणत्याही निवडणुकांना स्थगिती देण्यात आलेली नाहीय. ही प्रक्रिया सुरू राहील. मात्र ज्या ४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायतींमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांहून अधिक ओलांडली गेली आहे, त्यांचा अंतिम निकाल या प्रकरणाच्या निकालावर अवलंबून असेल. याचाच अर्थ या ५७ संस्थांमध्ये निवडून आलेले उमेदवार तेव्हाच पद ग्रहण करू शकतील, जेव्हा सर्वोच्च न्यायालय आरक्षण वैध ठरवेल, असंही सर्वोच्च न्यायालयानं नमूद केलंय.

राज्यातील 40 नगरपरिषदा आणि 17 नगरपंचायतींमध्ये 50 टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेल्याची कबुली राज्य निवडणूक आयोगाना सर्वोच्च न्यायालयात दिली होती.









# पालिका मतदानासाठी या तीन प्रभागात असतील चार मतदान केंद्रे

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**




राहुरी नगरपालिकेच्या दोन डिसेंबरला होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी 38 मतदान केंद्रे असून तीन प्रभागात एकाच ठिकाणी चार मतदान केंद्रे असून निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाचा निवडणूक विभाग अलर्ट मोडवर आल्याचे दिसून येत आहे. राहुरी नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी एक तर बारा प्रभागात 24 नगरसेवक पदासाठी दोन डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. यासाठी 12 प्रभागांमध्ये मतदार संख्येनुसार 38 मतदान केंद्रे असून प्रभाग क्रमांक 9, 11 व 12 मध्ये प्रत्येकी चार मतदान केंद्रे असतील तर प्रभाग क्रमांक आठ मध्ये दोन मतदान केंद्र असतील. अन्य सर्व प्रभागात प्रत्येकी तीन मतदान केंद्र असतील.

राहुरी नगरपालिका हद्दीतील प्रभाग निहाय मतदान केंद्रे अशी - प्रभाग क्रमांक एक - नूतन मराठी शाळा क्रमांक सात (दोन केंद्रे), क्रमांक आठ (एक केंद्र)

प्रभाग क्रमांक दोन - भागीरथीबाई तनपुरे कन्या विद्यालय (दोन केंद्रे) जिम्नेशियम हॉल (अहिल्या भवन)- (एक केंद्र)

प्रभाग क्रमांक तीन - शाहू मंगल कार्यालय (एक केंद्र) नूतन मराठी शाळा नंबर चार (दोन केंद्रे)

प्रभाग क्रमांक चार - भागीरथीबाई तनपुरे प्राथमिक शाळा (तीन केंद्रे)

प्रभाग क्रमांक पाच - भागीरथीबाई प्राथमिक शाळा (एक केंद्र), विद्यामंदिर प्रशाला (दोन केंद्रे),

प्रभाग क्रमांक सहा - प्रगती विद्यालय (तीन केंद्रे)

प्रभाग क्रमांक सात - नूतन मराठी शाळा नंबर 1 (3 केंद्रे)

प्रभाग क्रमांक आठ - गाडगे आश्रम शाळा (दोन केंद्रे)

प्रभाग क्रमांक नऊ - गाडगे आश्रम शाळा (एक केंद्र), नूतन मराठी शाळा नंबर 2 व नंबर 11 (3 केंद्रे)

प्रभाग क्रमांक दहा - नूतन मराठी शाळा नंबर सहा व दहा (दोन केंद्रे), गाडगे आश्रम शाळा (एक केंद्र)

प्रभाग क्रमांक 11 - नूतन मराठी शाळा नंबर 9 (दोन केंद्रे), केशर रंग मंगल कार्यालय (दोन केंद्रे)

तर प्रभाग क्रमांक बारा करिता शहरातील विद्यामंदिर प्रशाला - (चार केंद्रे) असतील.

प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्र अधिकारी, सहाय्यक अधिकारी, कर्मचारी, मदतनीस बंदोबस्तासाठी पोलीस असा सहा जणांचा स्टाफ नेमण्यात येत असून एकंदरीत या निवडणूक मतदान प्रक्रियेसाठी 250 ते 300 अधिकारी कर्मचारी मदतनीस असा स्टाफ असणार आहे.

राहुरी नगरपालिका निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अनुप सिंह यादव यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी नगरपालिकेच्या निवडणूक यंत्रणा अलर्ट मोडवर सध्या काम करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



ठाणे, दिवा : भारतीय जनता पार्टी दिवा मंडळ महिला मोर्चा आयोजित दिवा भागातील आगासन येथे ठाणे महानगरपालिका आरोग्य विभागाच्या माध्यमातून महिलांसाठी मोफत मेमोग्राफी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. आगासन गावातील दत्त मंदिर येथे दिवा भाजप महिला मोर्चा अध्यक्षा सौ. सपना रोशन भगत आयोजित सदर शिबिरात महिलांसाठी मोफत ब्रेस्ट कॅन्सर अवेरनेस व मेमोग्राफी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीर सकाळी ११ वाजेपासून संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सुरु होते. शिबिरात महिलांना स्तनाच्या कर्करोगाबाबत जनजागृती करुन त्यांची आवश्यक तपासणीसह मोफत मॅमोग्राफी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली तसेच पात्र लाभार्थ्यांसाठी आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आरोग्य विमा कार्ड तयार करुन देण्यात आले आहे.

## थोडक्यात बातम्या...



### मल्लांचा थरार! कंधारेवाडी खंडोबा यात्रेत ऐतिहासिक कुस्तीचा 'आखाडा'

कंधार तालुका (स. गांवकरी) : कंधारेवाडी, ता. कंधार येथील खंडोबा यात्रेत यंदा प्रथमच कुस्तीचा थरार अनुभवायला मिळाला. या ऐतिहासिक कुस्तीच्या आखाड्याने नांदेड, हिंगोली, परभणी आणि लातूर जिल्ह्यांतील नामांकित मल्लांना एकत्र आणले, ज्यामुळे कुस्तीचे सामने चांगलेच रंगले. अनेक चुरशीच्या लढतीनंतर, या कुस्ती स्पर्धेतील पहिले बक्षीस नांदेड जिल्ह्यातील बामनी येथील पैलवान दिलीप किशन सांगळे यांनी पटकावले. सांगळे यांनी आपल्या दमदार खेळाने उपस्थितांची मने जिंकली. दुसरे बक्षीस कृष्णा कैलास फुलारी तर तिसरे बक्षिस दिप कागणे या पहेलवानाने जिकले विजेत्या पैलवानाला बक्षीस वितरण गावचे ज्येष्ठ आणि प्रतिष्ठित नागरिक रामचंद्र डिगोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच शंकर डिगोळे, माजी सरपंच केशव कंधारे, माजी उपसरपंच गुरुनाथ आमलापुरे, पोलीस निरीक्षक वाघमारे, पो.कॉ. बालाजी गारोळे, पो.पा. मोरे, तंटामुक्ती अध्यक्ष भगवान कंधारे, राजीव कंधारे, रमेश बारोळे ,माजी चेरमण माधव जिंके यांसह अनेक मान्यवर आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी या रोमांचक कुस्तीच्या डावासाठी हजेरी लावली होती. या यशस्वी आयोजनामुळे कंधारेवाडीच्या यात्रेत एक नवीन उत्साह संचारला.

### वाळू वाहतुकीमुळे हाडोळी-लातूर सीमा रस्त्याची दुर्दशा; स्थानिकांकडून संताप

कंधार तालुका (स. गांवकरी) : कंधार तालुक्यातील हाडोळी ते लातूर सीमेला जोडणाऱ्या महत्त्वपूर्ण रस्त्याची अवैध वाळू वाहतुकीमुळे दयनीय अवस्था झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग (सा.बा.वि.), कंधार यांनी हा रस्ता चांगल्या दर्जाचा केला होता, मात्र आता तो पूर्णपणे उखडून गेला आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, नांदेड जिल्ह्यातून लातूरकडे होणारी अवैध वाळूची वाहतूक या रस्त्यावरून रात्रंदिवस मोठ्या प्रमाणात सुरू असते. क्षमतेपेक्षा अधिक वाळू भरलेल्या जड वाहनांची (टिप्पर/हायवा) सततची ये-जा या रस्त्यासाठी घातक ठरली आहे. परिणामी, काही महिन्यांपूर्वी झालेला हा रस्ता पूर्णपणे तुटला असून, सर्वत्र खड्डे पडले आहेत. या दुर्दशेमुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासनाने तातडीने या अवैध वाळू वाहतुकीवर कठोर कारवाई करावी आणि रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.



### ठाणे मनपाच्यावतीने नागरिकांसाठी सुपर स्पेशालिटी डेंटल क्लिनीक सुरू

■ खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते उदघाट्न

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून सर्व सुविधांनी युक्त् अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज असे सुपर स्पेशालिटी डेंटल क्लिनीक टेभींनाका येथील सी. आर. वाडिया दवाखाना येथे सुरू करण्यात आले. या क्लिनीकचे उद्घाटन आज खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, उपायुक्त उमेश बिरारी, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. वर्षा ससाणे, माजी नगरसेविका पूजा वाघ आदी उपस्थित होते. सी.आर. वाडिया दवाखान्यात सुरु झालेल्या सुपर स्पेशालिटी डेंटल क्लिनीकमध्ये डेंटल चेकअप, डेंटल क्लिनींग, डेंटल फिलींग, टूथ एक्सट्रॅक्शन इत्यादी उच्च दर्जाच्या सेवा नागरिकांना मोफत उपलब्ध होणार आहे. याकरिता 2 स्पेशालिस्ट डॉक्टरांची नियुक्त् करण्यात आली आहे. ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दंतविभागातही या सेवा देण्यात येतात. या रुग्णालयात मोठ्या प्रमाणात रुग्णसंख्या असल्याने अनेकवेळा रुग्णांना खाजगी दवाखान्यात जाऊन उपचार घेणे परवडत नाही, तसेच बरेच वेळा हे उपचार मेडिकल पॉलीसीमधून नाकारण्यात येतात. रुग्णांना वेळेवर उपचारमिळावेत यासाठी सी.आर. वाडिया दवाखान्यात हे डेंटल क्लिनीक सुरू करण्यात आले आहे. त्याचबरोबर पाळीव प्राण्यांची 'Pet Care Thane' अंतर्गत नोंदणी, मध्यवर्ती औषधी भांडारगृह येथे औषण वितरण करण्याकरिता आधुनिक तंत्रप्रणाली, जीआयसी हाऊंसीग फायनान्सच्या लिमीटेडच्या सीएसआर निधीतून प्राप्त झालेल्या सोनोग्राफी मशीन्स, तसेच काजूवाडी आरोग्य केंद्र, शिळ आरोग्य केंद्र या दोन ठिकाणी नवीन एक्स रे मशील तसेच 22 नागरी आयुष्मान आरोग्य मंदिराचे लोकार्पण खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते महापालिकेच्या नरेंद्र बल्लाळ सभागृहात ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले.

# 'हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन कॉलेज ऑफ नर्सिंग'चा प्रथम वर्षाचा निकाल १०० टक्के




**अकोले (जि. अहमदनगर) : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर असलेल्या कळसुबाई पर्वतरांगांमध्ये वसलेल्या अकोले तालुक्यातील हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन कॉलेज ऑफ नर्सिंग अँड रिसर्च सेंटर, अकोले येथील जी.एन.एम. प्रथम वर्ष 2024-25 या शैक्षणिक वर्षाचा निकाल 100 टक्के लागून संस्थेने यशाची नवी उंची गाठली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने विशेष अभिनंदन करण्यात आले.

ग्रामीण भागात आरोग्य सेवेत मोलाचे योगदान देणारे डॉ. एम. भांडकोळी यांनी या संस्थेची धुरा सांभाळत विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न केले. शासन धोरणापासून ते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासापर्यंत प्रत्येक गोष्टीकडे संस्थेने प्राधान्य दिले. गुणवत्तेचा झेंडा कळसुबाईच्या गर्भात रोवण्याचे काम महत्त्वपूर्ण असल्याचे संस्थेचे प्रवर्तक डॉ. ज्योती भांडकोळी यांनी सांगितले.

**गुणवंत उत्तीर्ण विद्यार्थी :** प्रवीण बगाड, प्रीती भालेराव, समीक्षा भोसले, सुरज भुजबळ, रोशनी चव्हाण, वनिता दाभाडे, सीमा धिंदळे, राहुल दिघे, शिवानी गंभीरे, प्रवीण घोडे, स्वाती घोडे, स्वाती घोडे (चिमा), माधुरी हिले, सपना इंदोळे, शितली दे, महेश कचरे, किशोर कचरे, किसन कोळपे, शैला लोहोकरे, प्रेरणा मदगे, हर्षला मदगे, लक्ष्मी माळी, अंकुश नाडेकर, साक्षी तळेकर, संगीता सारुकते, शितल शिंगवे, बाळू वाळेकर, अनुजा वाळेकर, राणी वायाळ, श्वेतली परसूर यांनी आपले उत्तम यश सिद्ध केले.

या यशामागे प्राचार्य कविता माने, उपप्राचार्य कीर्ति गंदले, पुनम कांबळे, नसर शेख, पंकज प्रधान यांचे मार्गदर्शन आणि अत्यंत मनापासून घेतलेले परिश्रम निर्णायक ठरले. संस्थेचे मार्गदर्शक डॉ. एम. भांडकोळी यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षकवृंद आणि पालकांचे यशस्वी कामगिरीबद्दल अभिनंदन करत भविष्यात आणखी नवे विक्रम प्रस्थापित करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## नील भालेरावची 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये नोंद

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

दीड वर्षाच्या नील निखिल भालेरावने 2 मिनिट 53 सेकंदात जगातील सुमारे 45 कार ब्रँडची ओळख देत 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये नोंद केली आहे. नील भालेरावने केलेला विक्रम हा केवळ आकड्यांपुरता मर्यादित न राहता भविष्यातील त्याच्या आणखीन प्रयत्नांकडे लक्ष वेधणारा आहे. लहान वयात मोठ्या प्रमाणावर स्मरणशक्तीद्वारे नावे लक्षात ठेवत त्याला आत्मविश्वासाने सादर करणे ही बाब उल्लेखनीय असल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद होणे ही प्रत्येकासाठी अभिमानाची बाब आहे.पण एवढ्या लहान वयात नोंद झाली असून त्याचं महत्व अधिकच आहे. या यशामागे नीलच्या जिद्दीबरोबरच त्याचे



पालक आई प्रेरणा भालेराव आणि वडील निखिल भालेराव यांचे मार्गदर्शन, सयंम आणि प्रोत्साहन ही महत्त्वाचे ठरले आहे. एवढ्या लहान मुलांमधील गुण ओळखून योग्य दिशेने प्रोत्साहन दिल्यास ते मोठ्या उंचीवर पोहोचू शकतात. नीलच्या या यशामुळे महाराष्ट्रासह देशाचे नाव उंचावले आहे.

## अवैध रित्या रेती उपसा करणाऱ्या ८ घाटावर एकाच दिवशी छापा टाकून ग्रामीण पोलीसांची कारवाई

■ ३७ लाख २२ हजाराचा मुद्देमाल जप्त

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

गोदावरी नदी पात्रात बोटीच्या साह्याने फिरून नांदेड ग्रामीण पोलिसांनी काळेश्वर, विष्णुपुरी, मार्कंड, पिंपळगाव, भनगी, वाहेगाव आणि गंगाबेट. या परिसरात छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा कारवायांचा पर्दाफाश केला.

या मोहिमेत एकूण ₹ ३७ लाख २२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून काही साहित्य शासनाच्या नियमांनुसार नष्ट करण्यात आले आहे. पोलिस अंमलदार शंकर माळगे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज सकाळी नऊ वाजता नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक नदीपात्रात कारवाईसाठी रवाना झाले. या



पथकात ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, तसेच पोलीस अंमलदार मुंडे, श्याम भोसले, शेख, शंकर माळगे, सिरमलवार, चावरे, शेख जमीर, शेख आसीफ. धम्मपाल कांबळे. लव्हारे आदी नी या कारवाईत सामावेश होते. पथकाने कल्लाळ परिसरातून बोटीच्या साह्याने नदिपात्रातील लपवुन ठेवलेले साहित्य मिळण्यासाठी गस्त घालून अनेक ठिकाणी धाड टाकुन तेथे अवैध रित्या रेती उपसा होत असल्याचे निर्दशनास आले असता त्या ठिकाणी धाडी टाकून सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला यात १० ब्रास रेती किंमत ५० हजार रुपये ५४ तराफे किंमत २७ लाख ३ इंजिन किंमत ९ लाख १२ लोखंडी ड्रम किंमत १२ हजार १५ प्लास्टिक ड्रम किंमत ९ हजार १७ लोखंडी पाईप किंमत ५१ हजार असा एकुण ३७ लाख २२ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला तर काही शासनाच्या नियमप्रमाणे जागेवर नष्ट करण्यात आला असून या प्रकरणात अरोपी संतोष हंबर्डे रा विष्णुपूरी त्यांच्या सोबत संजीवन बिन हारून बिन व वकील मिश्री साहनी यासह इतर तिन जणावर गुन्हा क्र ११३५ / २०२५ प्रमाणे नोंदवण्यात आला आहे.

या कारवाई बद्दल पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार व इतवारा उपविभागाचे पोलीस उपअधिक्षक प्रशांत शिंदे यांनी ग्रामीण पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोळकर व कर्मच्यारी यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

## स्वारातीम विद्यापीठातील नाट्य विभागाने जिंकली प्रेक्षकांची मने

### थिएटर हाऊसफुल्ल, तो ती मनोहर नाटकाला प्रचंड प्रतिसाद

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी नुकतीच शहरातील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात पार पडली. दि.१६ नोव्हेंबरला सुरुवात झालेल्या या स्पर्धेची सांगता दि.२७ नोव्हेंबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ललित व प्रयोगजीवी कला संकुलातील नाट्य व चित्रपट विभागाच्या विद्यार्थ्यांच्या नाटकाने झाली. विद्यार्थी लेखक व दिग्दर्शक अतुल साळवे यांच्या तो ती आणि मनोहर या नाटकाला नांदेडच्या नाट्यरसिकांनी उदंड प्रतिसाद दिला.

अक्षरशः शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह हाऊसफुल्ल झाले. बसायला जागा कमी पडत असतानाही काही प्रेक्षकत हे पायऱ्यावर तर काही उभे राहून नाट्यानुभव घेत असल्याचे चित्र यावेळी बघायला मिळाले. नाटकातील उत्कट प्रसंगांना, संवादाला, अभिनयाला नांदेडच्या नाट्यरसिकांनी भरभरुन दाद दिली. विद्यापीठातील नाट्य व चित्रपट विभागातील एम. ए. नाट्यशास्त्र अभ्यासक्रमातील प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी संचालक डॉ पृथ्वीराज तौर व नाट्य व चित्रपट विभागाचे प्रा. राहुल जयप्रकाश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या नाटकाची निर्मिती केली आहे.

यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरु डॉ अशोक महाजन, कुलसचिव डॉ डी.डी.पवार, संचालक डॉ पृथ्वीराज तौर, डॉ. पी. विठ्ठल व विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही नाटकाला उपस्थित राहुन विद्यार्थी कलावंतांचा उत्साह वाढवला. विजय गजभारे, सपना वाघमारे, मानसी बेलापुरकर, राहुल मोरे, चंद्रकांत तोरणे, करन गुडेवार यांनी आपल्या



कसदार अभिनयाने प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवले.

तो ती मनोहर या नाटकाचे लेखन-दिग्दर्शन- विद्यार्थी अतुल साळवे यांनी केले, तर निर्मीती प्रमुखाची जबाबदारी नाट्य विभागातील प्रा. राहुल गायकवाड यांनी सांभाळली.

या नाटकाची प्रकाश योजना - माणिकचंद थोरात, रंगभूषा - सौ द्वारका साळवे, वेशभूषा- कांचन वसेकर, नेपथ्य- राहुल गायकवाड व संगीत अतुल साळवे यांनी केले, तर मंच व्यवस्थापनाची जबाबदारी नागेश सोनकांबळे, रोहन पंडित, अमित सोनकांबळे, निलेश गच्चे, अजिंक्य जाधव, सुनिल ममदापुरे, सचिन थोटे, सुमित सोळंके, गजेस्विनी देलमाडे यांनी पार पाडली.

# डॉ. रफिक सय्यद यांना 'सेनापती बापट स्मृती पुरस्कार' प्रदान

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

सामाजिक सलोखा आणि आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्याबद्दल सावित्री फातेमा सदभावना मंचाचे प्रवर्तक कार्याध्यक्ष डॉ. रफिक सय्यद यांना गौरव समूह आणि कृषी जनकल्याण प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा मानाचा 'सेनापती बापट स्मृती पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. पारनेर येथील स्वातंत्र्य सेनानी सेनापती बापट यांचे स्मृती दिनानिमित्त डॉ. रफिक सय्यद यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. डॉ. सय्यद यांनी सदभावना मंचच्या माध्यमातून सामाजिक सलोखा आणि



विकासासाठी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे.पुरस्कार वितरण समारंभास खासदार डॉ. निलेश लंके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यात प्रामुख्याने कवी साहेबराव ठाणगे, शाहीर गायकवाड, रा. या. औटी, अर्जुन भालेकर, अरुण आंधळे पाटील, पत्रकार संजय वाघमारे, पत्रकार मार्तंडराव बुचूडे सर, पत्रकार देविदास आबुज, प्राचार्य रंगनाथ आहेर (सर), नगराध्यक्ष डॉ. विद्या कावरे, उपनगराध्यक्ष सुप्रिया शिंदे, नगरसेवक योगेश मते, अरुण भंडारी आदींचा समावेश होता.

यावेळी बोलताना मान्यवरांनी डॉ. रफिक सय्यद यांच्या विविध विभागीय कार्याचा गौरव केला. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी केलेले काम इतरांना प्रेरणा देणारे आहे. आरोग्य शिबिरे, शैक्षणिक मार्गदर्शन त्यांनी समाजाला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे, असे गौरवोद्गार काढण्यात आले. गौरव समूह आणि कृषी जनकल्याण प्रतिष्ठान दरवर्षी पारनेर परिसरातील समाजोपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना स्वातंत्र्य सेनानी सेनापती बापट यांच्या नावाने हा पुरस्कार देऊन सन्मानित करते. डॉ. सय्यद हे या पुरस्काराचे मानकरी ठरल्याने पुरस्काराची प्रतिष्ठा वाढली आहे, अशी भावना आयोजकांनी व्यक्त केली. पारनेरच्या सर्वांगीण विकासासाठी काम करत राहणे, हीच खरी सेनापती बापट यांना आदरांजली ठरेल. हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून, माझ्यासोबत काम करणाऱ्या प्रत्येक सदभावना मंचच्या कार्यकर्त्याचा आहे.पुरस्कार मिळाल्यानंतर डॉ. सय्यद यांनी आपल्या भावना व्यक्त करताना, "विश्वकल्याणासाठी समाज कार्य करत राहणे, हीच खरी सेनापती बापट यांना आदरांजली ठरेल. हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून, माझ्यासोबत काम करणाऱ्या प्रत्येक सदभावना मंचच्या कार्यकर्त्याचा आहे," असे नम्रपणे सांगितले.कार्यक्रमाच्या समारोपात आयोजकांनी उपस्थित सर्व मान्यवर आणि नागरिकांचे आभार मानले. डॉ. रफिक सय्यद यांच्यासारख्या कर्तृत्ववान व्यक्तीचा गौरव केल्याबद्दल नागरिकांनीही संस्थेचे कौतुक केले.

# बोरीवली ग्रामपंचायतीकडून नागरिकांना लाभ घेण्याचे आवाहन

- मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ३१ डिसेंबरपर्यंत थकबाकीदारांसाठी मोठी संधी

भिवंडी : (समर्थ गांवकरी)



राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत भिवंडी तालुक्यातील बोरीवली ग्रामपंचायतीने नागरिकांसाठी मोठा दिलासा जाहीर केला आहे. चालू वर्षाचा संपूर्ण कर तसेच थकबाकीची ५० टक्के रक्कम एकरकमी भरल्यास, निवासी मालमत्ता, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती करात तब्बल ५०% सवलत देण्यात येणार आहे. ही सवलत फक्त अभियान कालावधीत - ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत लागू आहे. ग्रामपंचायत हद्दीतील निवासी मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती करात दिल्या जाणाऱ्या या सवलतीचा लाभ घेण्यासाठी नागरिक पुढाकार घेत असल्याची माहिती ग्रामपंचायतीतर्फे देण्यात आली आहे. योजनेनुसार, २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षाचा संपूर्ण कर एकरकमी भरणे बंधनकारक आहे. तसेच १ एप्रिलपूर्वीची थकबाकी भरताना लागू होणारी ५० टक्के सवलत मिळवण्यासाठी उर्वरित थकबाकीची रक्कमदेखील एकरकमीच जमा करावी लागणार आहे.

सवलतीचा लाभ मिळण्यासाठी ग्रामपंचायतीने नागरिकांना वेळेत कर भरण्याचे आवाहन केले असून, अनेक नागरिकांनी सवलतीचा लाभ घेण्यास सुरुवात केली आहे.

**अटी व नियम :**

**चालू वर्षाचा (घरपट्टी, पाणीपट्टी, दिवाबत्ती) संपूर्ण कर एकरकमी भरणे आवश्यक.**

**१ एप्रिलपूर्वीची थकबाकी ५०% सवलतीसह एकरकमी भरावी.**

**सवलत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच उपलब्ध.**

**निवासी मालमत्ता धारकांनी या योजनेचा लाभ घेऊन थकबाकी कमी करण्याचे आवाहन बोरीवली ग्रामपंचायतीकडून करण्यात आले आहे.**



नांदेड जिल्हा : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दि. ४ ते ८ डिसेंबर २०२५ दरम्यान २७ वा महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आलेला आहे. या भव्य क्रीडा महोत्सवासाठी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्या स्थापन करून तयारी जोरात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर आज दि. २८ नोव्हेंबर रोजी मा. राज्यपाल नियुक्त मा. राजभवन स्पर्धा परीक्षा निरीक्षण समितीने विद्यापीठाच्या क्रीडा सुविधांचे निरीक्षण केले. समितीने विविध विभागांकडून अद्यावत माहिती घेत संपूर्ण तयारीचे परीक्षण केले.

## थोडक्यात बातम्या...



### मुखेडच्या विकासासाठी आश्वासन नाही वचन देतो : खा. श्रीकांत शिंदे

मुखेड (स. गांवकरी) : मुखेड शहराचा विकास करावयाचा असेल तर शिवसेनेचे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. विजया देबडवार व युतीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतानी विजयी करा, शहराच्या विकासासाठी आश्वासन नाही तर वचन देतो असे प्रतिपादन खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले. ते आज मुखेड नगर परिषद निवडणुकीच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर आ हेमंत पाटील, आ. बोंढारकर, माजी आमदार सुभाष साबणे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, माधव दादा जमदाडे,शिवसेना जिल्हा प्रमुख उमेश मुंडे आदीची उपस्थिती होती. खा. श्रीकांत शिंदे म्हणाले की, येथील कामगार, मजूराच्या हाताला काम मिळण्यासाठी येथे एमआयडीसीची गरज आहे, या खात्याचे मंत्री शिवसेनेचे मंत्री उदय सामंत हे आहेत, त्यांना सागून लवकरच हा प्रश्न निकाली काढू. बजरगनगर येथील हद्दवाढीचा प्रश्न सुद्धा निकाली काढण्यात येईल यासाठी लाडक्या बहिणीनी विधानसभेला जसे बहुमताने निवडूण दिले त्याच प्रकारे नगर पालिकेच्या निवडणुकीत सुद्धा शिवसेना युतीच्या सर्व उमेदवारांना निवडून देऊन येथे सत्ता परिवर्तन करावे असे आवाहन खा. शिंदे यांनी केले. प्रास्ताविकात टि. व्ही. सोनटक्के सरांनी शहरातील बकाल रस्ते, कचरा कुडी, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, आदी स्थानिक प्रश्न उपस्थित करून आ. राठोड यांच्यावर टिका केली.

### बरबडा येथे येळकोट येळकोट जय मल्हार च्या जेय घोषणेत पालखी मिरवणूक संपन्न



नायगाव (स. गांवकरी) : नायगाव तालुक्यातील बरबडा येथे खंडोबा देवाची पालखी व जत्र मोठ्या उत्साहात मनोभावी एक महिणा पुजा पाठ दि . २८ रोजी सकाळी विविध सामाजिक राजकीय मंडळी घ्या उपस्थित खंडोबा देवाची पालखीचे पूजन करून पालखी बरबडा गावाने मिरवणूक काढण्यात आली येळकोट येळकोट जय मल्हार च्या घोषणेने पालखी मिरवणूक काढण्यात यावेळी मनोज पाटील मोरे , माणिक लोहगावे , बालाजी मदेवाड. , सुदर्शनराव धर्माधिकारी , बाळासाहेब धर्माधिकारी . प्र . मनोहर पवार , बालाजी धर्माधिकारी , व्हि टि .सुरेवाड धनगर समाजातील सर्व समाज बांधव उपस्थित होते व आदि गावातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होते महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या बरबडा येथील व परिसरातील नागरिकांनी श्री.खंडोबारायाचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थितीत होते

# तिरंगी संघर्षात कंधार तापले; मतदार शांत, नेते अस्वस्थ

- स्थानिक प्रश्न व जातीय समीकरणांचा प्रभाव
- कंधारमध्ये लढत अधिक चुरशीची

कंधार : (समर्थ गांवकरी)



कंधार नगर पालिका निवडणुकीची रणधुमाळी दिवसेंदिवस वाढत असून शहरात गुप्त बैठकांचा आणि सेटलमेंटच्या हालचालींचा जोर चांगलाच वाढला आहे. कोणत्या गटाच्या समीकरणांना फायदा होणारा आणि कोणाचा डाव उलटणार, हे चार दिवसांत स्पष्ट होणार आहे.

कॉंग्रेस पक्ष,भाजपा आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस आमने-सामने आल्याने यंदाची निवडणूक चुरशीची बनली आहे. अनेक प्रभागांत तिरंगी तर काही ठिकाणी चौरंगी लढतीची स्थिती निर्माण झाली आहे. मतांची विभागणी स्पष्ट दिसत असल्याने सर्व पॅनल समोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आणि प्रभागातील इच्छुकांनी घराघरांत जाऊन जनसंपर्काचा धडाका सुरू ठेवला आहे. मात्र, मतदारांची नगर पालिका निवडणुकीची रणधुमाळी दिवसेंदिवस वाढत असून शहरात गुप्त बैठकांचा आणि सेटलमेंटच्या हालचालींचा जोर चांगलाच वाढला आहे. कोणत्या गटाच्या समीकरणांना किती फायदा होणार आणि कोणाचा डाव उलटणार, हे येत्या 3 तारखेला स्पष्ट होणार आहे.

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आणि प्रभागातील नगरसेवकांनी घराघरांत जाऊन जनसंपर्काचा धडाका सुरू ठेवला आहे. मात्र, मतदारांची शांतता उमेदवारांना अधिक अस्वस्थ करत आहे. मतदार कोणत्या दिशेने झुकले आहेत याचा अंदाज न लागल्याने पॅनल प्रमुखांनी उमेदवारांना प्रभागातच थांबून प्रचार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. स्थानिक प्रश्न आणि उमेदवारांचे व्यक्तिमत्त्व हेच निर्णायक घटक ठरणार असल्याचे चित्र शहरात आहे. सध्या शहरातल्या प्रत्येक गल्ली बोळात निवडणुकीचे वातावरण तापलेले असतानाच राजकीय समीकरणे दर तासाला बदलत आहेत. त्यामुळे कोणत्या पॅनलचे पारडे जड होईल हे सांगणे कठीण झाले आहे.

विकास,कामे आणि आश्वासने याच्यापलीकडे जाऊन ही निवडणूक अंतर्गत नाराजी,राजकीय मैत्री, समाजनिहाय मते, स्थानिक वाद आणि गुप्त राजकीय डावपेच यांचा संगम बनली आहे. हा संगम आपल्या बाजूने फिरवण्यासाठी सर्व पॅनल शक्य ते सर्व प्रयत्न करत असून कंधारमधील राजकीय तापमान दिवसेंदिवस चढत असल्याचे चित्र आहे.

**जाती निहाय मतांच्या समीकरणात उलथापालथ**

या निवडणुकीत समाजनिहाय मतांचे गणित स्पष्टपणे जाणवत आहे. कोणत्या समाजाचे किती मते, त्या समाजातील प्रभावशाली व्यक्ती कोण, आणि त्यांना आपल्या बाजूला वळवण्याची धडपड पॅनलच्या नेत्यांनी सुरू केली आहे. काही प्रभागांत समाजातील मतांची विभागणीही जाणवू लागली आहे. याचा कोणाला फायदा होणार आणि कोणाला फटका बसणार, हे अद्याप अनिश्चित आहे.

# विविध मागण्यासाठी खा. अशोकराव चव्हाण यांच्याकडे साकडे

तामसा : (समर्थ गांवकरी)

- पिंपळगाव येथील गावकऱ्यांनी केली निवेदनात मागणी

नगरपंचायत हिमायतगर च्या भाजपा उमेदवार साठी प्रचारात जातं असताना श्री क्षेत्र पिंपळगाव येथे माजी मुख्यमंत्री व राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांनी नियोजित भेटी दरम्यान गावकऱ्यांनी आपल्या गावात स्वास्थ सुविधा, शिक्षण सुविधा, सडक असं मूलभूत सुविधे संदर्भात निवेदन देऊन साकडे घातले. मार्च २०२५ला पिंपळगाव येथे श्री दत्त मंदिरात मोठ्या थाटात पार पडलेल्या श्री शिव महापुराण कथा व १०८ कुंडी विश्वशांती महा यज्ञ अलौकिक सोहळा संपन्न झाला होता त्यावेळेस हा तीर्थक्षेत्र गावात महाराष्ट्र राज्य सह तेलंगाना, कर्नाटक,आंध्र प्रदेश येथून लाखो भक्तांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविल्या होता एवढा मोठा अलौकिक प्राप्त गावच्या विकास शून्य आहे गावची लोकसंख्या ३ हजार च्या जवळ पास असून गावात प्राथमिक उपचारासाठी १५किमी, तर मुलींना माध्यमिक शिक्षण साठी तामसा १२ किमी, पर्यायी सडक सुविधा नसल्याने महामंडळ च्या एसटी बस येत नाही त्या संदर्भात गावात विकासाचा भर पडावा म्हणून गावकऱ्यांनी निवेदन द्वारे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांना स्वास्थ्य सुविधे साठी प्राथमिक उप स्वास्थ्य केंद्र, शिक्षण संदर्भात मुलांना माध्यमिक शिक्षण साठी वर्गवाढ, पांदन रस्ते दुरुस्त करून, विधुत पुरवठा असे अनेक मूलभूत सुविधा पासून वंचित राहिलेल्या या तीर्थक्षेत्र गावचा विकास विकास वाहवा म्हणून गावकऱ्यांना निवेदन देऊन साकडे घातले.

# हदगाव तालुक्यातील ग्रामसेवकांचा गलथान कारभारास जनता वैतागली

तामसा : (समर्थ गांवकरी)

- गटविकास अधिकारी यांची ग्रामसेवक, कंत्राटी, रोजगार सेवकांवर वचक नाही ?

संबंधित गट विकास अधिकारी व ग्रामसेवक यांचे आर्थिक हितसंबंध असल्यानेच ग्रामसेवक आपल्या मर्जीनुसार सेवा बजावत असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष घालून कामचुकार ग्रामसेवकांवर कडक कारवाई करावी अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिकांमधून होत आहे. मागील दोन महिन्यापूर्वी आमच्या दैनिकात पंतप्रधान आवास योजनेत लूट बातमी प्रकाशित करून गट विकास अधिकाऱ्याचे लक्ष वेधले होते त्या बातमीच्या अनुषंगाने दिनांक २१ रोजी ग्रामपंचायत कार्यालय तामसा येथे अचानक भेट झाल्याने गटविकास अधिकारी कैलास बळवंत यांच्याशी संवाद झाल्याने अधिकाऱ्यांनी "हो तक्रारी च्या आधारे एका कंत्राटी वर कारवाई करून त्या कंत्राटी ला मुख्यालय पंचायत समितीत बसून काम करण्याची अजिबोगरीब कारवाई केली असं उत्तर दिल्यानं आश्चर्य व्यक्त होतं आहे.

हदगाव तालुक्यात एकूण १२५ ग्रामपंचायत च्या कार्यभार १०८ ग्रामसेवकांवर असल्याकारणाने नेमून दिलेल्या गावात ग्रामसेवक हजर राहत नसल्याने सर्व सामान्य जनतेची कामे वेळेवर होत नसल्याची तक्रार मोठ्या प्रमाणावर होत असल्याने याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावळी यांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे. हदगाव तालुक्यातील अनेक ग्रामसेवक कर्मचारी हे हदगाव, तामस्यात, पंचायत समितीत बसून कारभार पाहत आहेत तर काही ग्रामसेवक हे जिल्ह्याच्या ठिकाणी राहत असल्याने ठराविक दिवस बघून येणं जाण (अपडाऊन)करतात मुख्यालय राहणं बंधनकारक असून अथवा ग्रामपंचायत कार्यालय जाऊन उपस्थिती राहणं असून हे कामचुकार अधिकारी यांच्यावर गट विकास अधिकारी यांची कसलीच वचक नसल्या मुळे अधिकारी यांची मनमानी कारभार झाला असून "तेरी भी चूप मेरी भी चूप" असल्याचे दिसी येते त्यामुळे ग्रामीण भागातल्या सर्वसामान्य नागरिकांना अनेक समस्या निर्माण होत आहेत. नमुना नंबर ८, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, सह विविध प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सामान्य जनतेला हदगावला, तामसाला यावे लागत आहे. सदरील ग्रामसेवक हे नेमून दिलेल्या गावात नियमित येत नसल्यामुळे अनेकांना तर आपला गावचा ग्रामसेवक कोण आहे? याची विचारणा करावी लागत आहे. संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांचे नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. हदगाव पंचायत समितीला आठवड्यातून एक वेळा ग्रामसेवक स् कर्मचारी आढळून येतात दौऱ्याच्या नावाखाली त वैयक्तिक कामाकडे अधिक लक्ष देत असल्याचे दिसून येते. एका ग्रामसेवकाकडे अधिक ग्रामपंचायतचे प्रभार असल्याने कामानिमित्त फोन लावल्यास उडवा उडवीचे उत्तरे भेटतात विविध योजनेची माहिती ग्रामसेवकाकडून गावातल्या नागरिकांपर्यंत मिळत नसल्यामुळे विविध योजना पासून सामान्य नागरिकांना वंचित राहावे लागत आहे.

सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था (परसेवा)
अहिल्यानगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या.,अहिल्यानगर.

**विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित ता. जामखेड,जिल्हा.अहिल्यानगर.**

**जाहीर नोटीस**

| क्र. | कर्जदार / जामिनदाराचे नाव | अर्ज क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | कर्जदार - गणेश राजु पोकळे<br>जामिनदार - विकास सुनिल घोगरदरे<br>जामिनदार - सुनिल जालिंदर चव्हाण | ११७५ | १,१६,६०८ |
| २ | कर्जदार - संगिता प्रकाश नागरगोजे<br>जामिनदार - दादासाहेब मोहन वारे<br>जामिनदार - महादेव शहादेव राख<br>जामिनदार-रमेश प्रकाश क्षिरसागर | ११७७ | १७,३३,६०१ |
| ३ | कर्जदार - दादासाहेब मोहन वारे<br>जामिनदार - किरण मारुती बांगर<br>जामिनदार - प्रकाश जगन्नाथ नागरगोजे | ११९६ | ११,९१,०१३ |
| ४ | कर्जदार - महेश शहाजी खंडागळे<br>जामिनदार - विठाबाई शहाजी खंडागळे<br>जामिनदार - प्रविण सुर्यकांत राऊत | ११७८ | ३,७९,६८१ |
| ५ | कर्जदार - प्रकाश जगन्नाथ नागरगोजे<br>जामिनदार - महादेव शहादेव राख<br>जामिनदार - दादासाहेब मोहन वारे<br>जामिनदार-रमेश प्रकाश क्षिरसागर | ११७९ | १७,३२,८०४ |

सदर दाखल्यांचे कामी अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जातील प्रतीवादींना रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठविण्यात आलेले आहे.परंतु वरील प्रतिवादी यांना नोटीस रुजू न झाल्याने त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे व प्रथम सुनावणीस उपस्थित न राहिल्याने सदरचे जाहीर नोटीस देत आहोत.

उपनिर्दीष्ठ अर्जासंबधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत;जातीने दि.**१९/१२/२०२५** रोजी सकाळी /दुपारी **०१.००** वाजता दाव्या संबधी कागदपत्रासह आपण **सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा) अहिल्यानगर. अहिल्यानगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्यादित अहिल्यानगर.यांचे कार्यालय दुसरा मजला,व्यापारी संकुल, महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, ता.जिल्हा -अहिल्यानगर.४१४००१** या कार्यालयात उपस्थित रहावे.या नोटीसी व्दारे वरील प्रतिवादींना असे कळविण्यात येते की वरील तारखेस आपण सुनावणीस वेळेवर हजर न राहील्यास आपल्या गैरहजेरीत आपल्या अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व अर्जदार संस्थेने मागणी केल्याप्रमाणे वसुली दाखला अर्जदारसंस्थेस देण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यांस कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल म्हणून आज दि. **२६/११/२०२५** रोजी माझी सही कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर नोटीस दिले आहेत.

**(डॉ.अंजली वाघमारे)**
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा)
अहिल्यानगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या.,अहिल्यानगर.

स्थळ - अ.नगर
दिनांक -

# संविधान जगण्याची दिशा!

## संविधान दिनानिमित्त डॉ. विश्वासराव आरोटे यांचे प्रबोधन







पाचेधारवाडी : (समर्थ गांवकरी)

संविधान दिनानिमित्त आयोजित माता-पालक मेळाव्यात सामाजिक कार्यात नेहमी आघाडीवर असणारे, वंचित घटकांचे आवाज बनलेले डॉ. विश्वासराव आरोटे यांनी संविधानाचे महत्त्व अधोरेखित करत उपस्थित जनसमुदायाशी संवाद साधला.

कार्यक्रमात बोलताना डॉ. आरोटे म्हणाले की, "संविधान केवळ कागदी ग्रंथ नाही... ते आपल्या जीवनपद्धतीचे मार्गदर्शन करणारे दस्तऐवज आहे. संविधान सांगण्यासाठी नसून ते जगण्यासाठी आहे." ते पुढे म्हणाले, आपल्या हक्कांचा आणि अधिकारांचा योग्य ठिकाणी वापर होणे अत्यावश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळे भारताची लोकशाही जगातील सर्वोत्कृष्ट लोकशाही म्हणून ओळखली जाते.

या लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वागले पाहिजे. ज्याच्या हृदयात संविधान आहे, तोच व्यक्ती इतिहासाच्या पटलावर आपले नाव कोरू शकतो.

डॉ. आरोटे यांनी उपस्थित पालकांशी, महिलांशी आणि ग्रामस्थांशी सविस्तर संवाद साधला. शाळेतील शिक्षकांचे कौतुक करताना त्यांनी म्हटले,

"येथील शिक्षकांनी केलेल्या कार्याचा मला अभिमान आहे. शाळेला आवश्यक ती सर्व मदत देण्याचा मी प्रयत्न करेन." त्यांनी बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानावर भर देत विद्यार्थ्यांना आणि पालकांना आवाहन केले,

"शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा!" कार्यक्रमाची वैशिष्ट्ये,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण. संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन. संविधान दिनाचे महत्त्व समजावून सांगणे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, महिलांना साड्यांचे वाटप. शाळेसाठी घड्याळ भेट. ग्रामस्थ, पालक आणि शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग. प्रमुख मान्यवर उपस्थित सचिन भाऊ मेंगाळ (शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष), लताताई मेंगाळ, सुलोचना शेंडे, राणाबाई अस्वले, अमृता मेंगाळ, किसन मेंगाळ, राजू मेंगाळ, शारदा पथवे, निर्मला मेंगाळ, कॉम्रेड गावंडे, संतोष मेंगाळ, कैलास मेंगाळ, हिराबाई मेंगाळ, अश्विनी मेंगाळ, मंदाताई मेंगाळ आदी मान्यवर उपस्थित होते. आयोजन, सूत्रसंचालन: सुनीता जगताप, प्रयत्नशील: मुख्याध्यापक रवी रुपवते, संविधान दिनाचा संदेश गावोगावी पोहोचवणारा आणि लोकशाहीची किमया लोकांच्या मनात रुजवणारा हा कार्यक्रम सर्वांच्या मनाला भावला.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील आणखी एक मल्टीस्टेट पतसंस्था अडचणीत

## ठेवीदारांचे अडकले ५.६३ कोटी !

फिर्यादीसह ४९ ठेवीदारांच्या ५ कोटी ६३ लाख ४९ हजार ७६४ रुपयांच्या ठेवी देण्यास संचालक मंडळाने टाळाटाळ केल्याने आपली फसवणूक झाली असल्याचे त्यांच्या निर्दशनास आले. अखेर त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांनी ठेवीदारांचे अर्ज, ठेवीच्या पावत्या व इतर कागदपत्रांची चौकशी केल्यावर सौ.निकिता पवार यांची फिर्याद नोंदवून घेत गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये संस्थेच्या चेअरमन मंदाकिनी रंगनाथ वैद्य, संचालक मयूर रंगनाथ वैद्य, नितीन सोपानराव तुपे, शांतीसिंग नागनाथ साखरे, राम लक्ष्मण पोपळघट, किशोर अनिल सुरवसे, वैशाली मयूर सुरवसे, व्यवस्थापक प्रवीण म्हसे या ८ जणांचा समावेश आहे.

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर जिल्ह्यातील आणखी एक मल्टीस्टेट पतसंस्था अडचणीत आली आहे. भगवानबाबा मल्टीस्टेट पतसंस्थेच्या श्रीरामपूर शाखेत ४९ ठेवीदारांच्या ५ कोटी ६३ लाख ४८ हजार ७६४ रुपयांच्या ठेवी अडकल्या असून या ठेवींची रक्कम देण्यास टाळाटाळ केल्याने संस्थेच्या संचालक मंडळावर २६ नोव्हेंबर रोजी श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत ठेवीदार सौ.निकिता सचिन पवार (रा.केसापूर, ता.राहुरी) यांनी फिर्याद दिली. भगवानबाबा मल्टिस्टेटच्या नगर शहरासह शेवगाव, श्रीरामपूर, पाथर्डी तसेच शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी, बोधेगाव येथे शाखा आहेत. श्रीरामपूर शाखेत फिर्यादी निकिता पवार यांच्या पतीच्या नावे सन २०२३ मध्ये २ कोटी ९९ लाख ५५ हजार रुपयांच्या ठेवी ठेवल्या होत्या. या ठेवींची मुदत संपल्यावर आणि फिर्यादी यांच्या कुटुंबीयांना पैशांची आवश्यकता असल्याने त्या संस्थेत ठेवी आणि त्यावरील व्याजाची रक्कम मागण्यासाठी गेल्या असता ठेवी परत करण्यास टाळाटाळ सुरू करण्यात आली.

पवार यांनी संस्थेच्या चेअरमनसह संचालक मंडळाशी अनेक वेळा संपर्क साधून ठेवीच्या रकमेची मागणी केली. मात्र त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत वेळ मारून नेली. संस्थेकडून ठेवीची रक्कम तसेच व्याज मिळत नसल्याने ठेवीदार हवालदिल झाले. त्यानंतर त्यांनी अधिक माहिती घेतली असता या शाखेत अजून इतर ४८ ठेवीदारांच्या २ कोटी ६३ लाख ९४ हजार ७६४ रुपयांच्या ठेवी अडकल्या आहेत.



नाशिक : नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त तथा सदस्य सचिव शेखर सिंह यांच्यासह महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी गोदावरी नदीच्या काठावरील घाटांची पाहणी करून विविध सूचना केल्या. आयुक्त श्री. सिंह यांनी रामकुंड परिसर, गांधी तलाव, पांडे मिठाई पूल, बालाजी कोठ, गणेशवाडी पूल, रामसेतू पूल, गाडगे महाराज पुलासह अमरधामपर्यंतच्या घाटाची पाहणी केली. यावेळी महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे, महानगरपालिकेचे शहर अभियंता संजय अग्रवाल आदी उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### सावित्रीबाई फुले विद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा फुले यांना अभिवादन

नाशिक (स. गांवकरी) : क्रांतिकारी, समाजसुधारक, सत्यशोधक समाजाचे संस्थापक, शेतकरी, विचारवंत, लेखक,स्त्री शिक्षणाची सुरुवात करणारे क्रांतिसूर्य महात्मा फुले यांची १३५ वी पुण्यतिथी पखाल रोडवरील मातोश्री सावित्रीबाई फुले विद्यालयात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष भाऊराव बच्छाव तर प्रमुख अतिथी म्हणून कार्याध्यक्ष डी.डी.खैरनार, शिक्षणाधिकारी मधुकर बच्छाव, संचालिका डॉ. सुनिता जगताप, प्राचार्य गजानन घरटे, कीर्ती वर्मा ,अनुराधा जगताप, सुनील शेवाळे उपस्थित होते. प्रारंभी महात्मा फुले यांच्या पुतळ्यास प्रमुख अतिथींच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य गजानन घरटे यांनी केले. शिक्षिका प्रांजली निकुंभ यांसह विद्यार्थिनी श्रावणी वायाळ, अल्फिया बागवान, श्रावणी जगताप यांनी मनोगतातून महात्मा फुले यांच्या कार्याची ओळख करून दिली .आज आपण मुक्तपणे शिक्षण घेत आहात. स्त्रियांसाठी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या क्रांतीसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे योगदान मोलाचे आहे.असे संचालिका डॉ.सुनिता जगताप यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोकुळ माळी, स्वागतगीत ज्योती नागरे व आभार संजय साळवे यांनी मानले. याप्रसंगी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कुमशेत गावातील संयमी व प्रेमळ कै. अर्जुन भगत यांचे निधन



शिवनेरी (स. गांवकरी) : कुमशेत गावातील संयमी , प्रेमळ स्वभावाचे कै. अर्जुन बाजीराव भगत वय वर्ष ७० यांचे निधन झाले आहे. यांच्या पाठीमागे पत्नी, एक मुलगा, तीन मुली, सुना, जावई, भाऊ, बहीण, नातवंडे, चुलते , पतवंडे व पुतणे असा मोठा परिवार आहे. कै.अर्जुन भगत यांचे महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्ष मंगेश अरुण भगत हे पुतणे आहेत.कै. भगत गावात व परिसरात संयमी व प्रेमळ स्वभावाने म्हणून ओळखले जात होते.



### महात्मा फुलेंना स्मृतीदिनी अभिवादन

पारनेर (स. गांवकरी) : सामाजिक क्रांतीची मशाल पेटवणारे थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतीदिनी पारनेर शहरात त्यांच्या कार्याला आदराने अभिवादन करण्यात आले.शहरातील पूर्णाकृती पुतळ्यास सावित्री फातेमा सदभावना मंच पारनेर शहराच्या वतीने पुष्पहार अर्पण करून आदरपूर्वक अभिवादन करण्यात आले. महात्मा फुलेंनी स्त्री-शिक्षणासह समाजातील दुर्बल घटकांसाठी केलेल्या महत्त्वपूर्ण कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.या अभिवादन कार्यक्रमा साठी सदभावना मंचाचे प्रवर्तक कार्याध्यक्ष डॉ. रफिक सय्यद, अध्यक्ष ह. भ. प किसनराव पावडे, सचिव भाऊसाहेब औटी, ज्येष्ठ साहित्यिक साहेबराव ठाणगे,मारुती शेरकर (सर), दत्तात्रय घोडके, भिकाजी जगदाळे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किसनराव रासकर,शाहीर गायकवाड, माजी नगरसेवक डॉ. मुद्दसर सय्यद, सलीम शेख, राजु भाई शेख, बाळासाहेब शेटे, पत्रकार श्रीकांत चौरे, ईश्वर भोसले, भगवान नगरे आदी मान्यवर उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी महात्मा फुलेंच्या विचारांचे महत्त्व स्पष्ट केले आणि त्यांच्या समाजसुधारणेच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याची प्रतिज्ञा घेतली. महात्मा फुलेंनी शिक्षणाचे महत्त्व समाजाला पटवून दिले, तसेच अस्पृश्यता निवारण आणि समानतेसाठी केलेल्या प्रयत्नांचे यावेळी स्मरण करण्यात आले. हा कार्यक्रम महात्मा फुलेंच्या प्रेरणादायी जीवनाचे व कार्याचे स्मरण करणारा ठरला.

### सरपंच पती सह चार व्यक्तींवर कोयता गॅग कडुन जीवघेणा हल्ला

जामखेड (स. गांवकरी) : जामखेड तालुक्यातील झिक्री गावात सरपंच पती मिलिंद जीवडे व त्यांच्या चार साथीदारांवर तलवार, कोयता, रॉड व काठ्यांनी झालेल्या जीवघेण्या हल्ल्याने एकच खळबळ उडाली आहे. रोजगार हमी योजनेतील गैरव्यवहाराबाबत ग्रामसभेत व पंचायत समितीसमोर तक्रार करण्यात आली होती. याचाच राग मनात धरून आरोपी योगेश इथापे व त्याचे साथीदार घनश्याम कसाब, ऋषीकेश साळुंके, मयुर कसाब, अतुल कसाब आणि इतर 4–5 अनोळखी व्यक्तींनी नऊ ते दहा जणांच्या टोळीने जीवडे, त्यांचे चुलते आणि सोबतच्या लोकांवर हल्ला केला. तलवार व कोयत्याने केलेल्या वारांमुळे जीवडे गंभीर जखमी झाले.

# धैर्य, संयम, बाबांवरील भक्ती विश्वास अढळ ठेवा - ह. भ. प. बिलाडे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



"साईबाबांनी शिकवलेली खरी शिकवण म्हणजे निस्वार्थपणे केलेली मनुष्यजातीची सेवा,समाजातील दुर्बल,गरजू आणि असहाय्य व्यक्तींच्या मदतीसाठी हात पुढे केला, की भगवान साई प्रत्यक्ष कृपा करतात. प्रत्येकाने स्वतःमध्ये दया, प्रेम, आणि समतेची भावना वाढवली तरच खऱ्या अर्थाने साईमार्गाचे अनुकरण केले असे ठरेल."असे प्रतिपादन हभप. नामदेव आप्पा बिलाडे महाराजांनी केले त्यांच्या या सद्रदित आणि प्रेरणादायी भाषणामुळे भाविकांच्या डोळ्यांत भावनांचे अश्रू तरळले.

वसंतटेकडी येथील संदेशनगर येथील श्री.साई मंदिरात गुरुवार (दि.२७) रोजी हभप. नामदेव आप्पा बिलाडे महाराज यांच्या साईबाबांच्या चरित्रावर आधारित प्रभावी कीर्तनाने मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. प्रारंभी नवदांपत्याच्या हस्ते श्री साईबाबांची आरती करण्यात आली. त्यानंतर साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानतर्फे महाराजांचा व नवदांपत्याचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके, देविदास डहाळे, बबनराव नांगरे, श्री व सौ.रोशनी आकाश त्र्यंबके, सौ.भाग्यश्री वैभव पोकळे,सौ.रेखा धीरज उकिरडे,सौ. अनिषा अविनाश निक्रड,सौ.कावेरी प्रशांत पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.

कीर्तनात हभप नामदेव आप्पा बिलाडे महाराजांनी साईबाबांच्या जीवनातील प्रमुख प्रसंग प्रभावी शैलीत मांडत श्रद्धा, सबुरी, समता, करुणा आणि निस्वार्थ सेवा हे साईबाबांच्या जीवनातील मूलमंत्र असल्याचे सांगितले. महाराज म्हणाले की, "साईबाबांनी कधीही जाती - पातीचे भेद मानले नाहीत. त्यांच्या दारात कोणीही आला, तर तो आपलाच मानून मदतीचा हात पुढे करणारे ते दयामूर्ती होते. त्यांच्या जीवनातील आदर्श जर प्रत्येकाने आपल्या आचरणात आणले, तर समाजातील कलह, भेदभाव आणि मतभेद आपसूकच नाहीसे होतील." त्यांनी साईबाबांच्या 'सबुरी'ची महती सांगत कठीण प्रसंग येत असले तरी धैर्य, संयम आणि देवावरील अढळ विश्वास या तीन गोष्टी जीवनात आवश्यक असल्याचेही प्रतिपादन केले.

# संविधानाप्रती सर्वांनी निष्ठा ठेवून पालन करावे : डॉ. लक्ष्मणराव मतकर

**पारनेरः (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर कॉलेज येथे संविधान दिनानिमित्त संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी आपल्या भारताला 26 नोव्हेंबर 1949 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक प्रयत्नांनी संविधान मिळाले. हे संविधान भारताच्या सर्व नागरिकांना स्वातंत्र्य. समता. बंधुता आणि न्याय याची हमी देते. आपण भारताचे नागरिक म्हणून संविधानाप्रती निष्ठा ठेवून प्रामाणिकपणे पालन केले पाहिजे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमास एन.सी.सी. विभाग प्रमुख प्रा. शांता गडगे, एन.एस. एस. विभाग प्रमुख प्रा. नामदेव वाल्हेकर, डॉ. विजय सुरोशी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. जिजाभाऊ घुले यांनी राज्यघटनेच्या सरनाम्याचे वाचन करून विद्यार्थ्यांना संविधान दिनाची शपथ दिली.

# लोक सोडून का चालले यावर विचारमंथन करा

■ प्रा. राम शिंदे यांची रोहित पवार यांच्यावर टीका

**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**



माझ्या राहणीमानावर न बोलता, त्यांनी आपल्याला लोक सोडून का जातात, याचे उत्तर निदान आता तरी द्यावे. आम्ही 'म्हाडा' मार्फत ८५० घरे बांधली व ते दिली. त्यांनी विश्रामगृह बांधले; पण जनतेला त्याचा उपयोग आहे का? हा आमच्या विकासामधील फरक आहे. त्यामुळे त्यांनी भुलभुलैय्या करू नये, असा प्रतिहल्ला विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आ. रोहित पवार यांचे नाव न घेता केला.

जामखेड नगरपरिषद निवडणुकीसाठी गुरुवारी दि.२७ रोजी भाजपच्या वचननाम्याचे प्रकाशन झाले. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी पवारांवर जोरदार टीका केली. शिंदे म्हणाले, की जामखेड शहराला स्वच्छ पाणीपुरवठा व्हावा, यासाठी २०१९ ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाणीपुरवठा योजनेला तत्वतः मान्यता दिली. राज्यात सत्ताबदल होताच, आमदारांनी या योजनेला खीळ घातली. त्यामुळे योजना लांबली. अडीच वर्षांनंतर सत्ताबदल होताच, आपण १७० कोटींच्या योजनेची अंमलबजावणी केली. सहा महिन्यांत शहरवासीयांना पाणी दररोज मिळेल. या योजनेचे त्यांनी चुकीच्या पद्धतीने भूमिपूजन केले. याबाबत आपण कधीही समोरासमोर चर्चा करायला तयार असल्याचे आव्हान शिंदे यांनी दिले.

जामखेड नगर परिषदेसाठी त्यांच्या मुलाखती बाहेरगावी होत असतील, तर पुढील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी दिल्ली किंवा दुबईला मुलाखती होतील, अशी टीका करीत शिंदे म्हणाले, की १० वर्षानंतर निवडणूक होत आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांतील कार्यकर्ते थांबण्यास तयार नव्हते. आपण त्यांच्याबरोबर चर्चा केली; पण युती झाली नाही. राजकीय पक्षाचे पॅनेल लंगडे झाले असले, तरी फक्त आमचाच पॅनेल परिपूर्ण आहे.

# ज्ञानसंपदा स्कूल इंग्लिश मिडीयमच्या खेळाडू रुद्र नितीन केने मिळवले यश

## रुद्र केने राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये पुणे विभागाचे करणार नेतृत्व

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे यांच्या वतीने शासकीय विभागीय स्क्वॉश अँड रॅकेट या क्रीडा प्रकाराच्या स्पर्धेत अहिल्यानगर (मनपा) जिल्ह्यातून ज्ञानसंपदा स्कूल इंग्लिश मिडीयमच्या खेळाडूने उत्कृष्ट कामगिरी करून राज्य स्तर स्पर्धेसाठी झेप घेतली.

या स्पर्धेत पुणे शहर, पुणे ग्रामीण, सोलापूर शहर, सोलापूर ग्रामीण, पिंपरी चिंचवड, अहिल्यानगर शहर व अहिल्यानगर ग्रामीण या ७ जिल्ह्यातून खेळाडू सहभागी होते. सांघिक प्रकारात अहिल्यानगर विभाग १४ वर्ष वयोगट प्रथम, वैयक्तिक क्रीडा प्रकार रुद्र नितीन केने विभागात पाचवा राज्य स्पर्धेसाठी निवड. रुद्र केने राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये पुणे विभागाचे नेतृत्व करणार आहे.

रुद्रला क्रीडा शिक्षक मच्छिंद्र साळुंके (NIS COACH), गोरक्ष धात्रक, विकास परदेशी (NIS COACH ) यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिवांजली अकोलकर यांनी रुद्रचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. शाळेचे शिक्षकवृंद यांनी भरभरून कौतुक केले.

# शहरातील अल्पवयीन मुलीवर धर्मांतराचा दबाव

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील एका व्यापाऱ्याच्या अल्पवयीन मुलीसोबत सोशल मीडियावरील ओळखीचा गैरफायदा घेत तिच्यावर धर्मांतरासाठी दबाव आणल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात कोतवाली पोलिसांनी दोन दिवसांपूर्वी दाखल केलेल्या गुन्ह्यात पोक्सो, विनयभंग कलमांची भर घातली आहे. शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी याबाबत माहिती दिली. गंज बाजार परिसरातील जुना कापड बाजार रस्त्यावर राहणाऱ्या व्यापाऱ्याच्या घरी सोमवारी (२४ नोव्हेंबर) सकाळी सुमारे ११.३० वाजताच्या सुमारास अल्पवयीन मुलीकडे संशयित मुलाने अनधिकृतपणे घरात प्रवेश करून पैशांची मागणी केली.

पैसे न दिल्यास पीडितेच्या वडिलांना ठार मारण्याची धमकीही दिली. मुलीने ही माहिती तातडीने वडिलांना दिल्यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दाखल केली.

# कोठारी बंधूंनी दिलेले बलिदान सदैव स्मरणात राहील : आ. संग्राम जगताप

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



अयोध्या येथे १९९० साली कार सेवा करत असताना कोलकत्ता येथील बजरंग दलाचे राम कोठारी व शरद कोठारी हे कोठारी बंधू शहीद झाले.धर्म कार्यासाठी त्यांनी बलिदान दिले. रक्तदानाच्या कार्यातून अहिल्यानगर येथील युवकांनी त्यांना आदरांजली दिली आहे. विश्व हिंदू परिषदेचे माजी जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे यांनी जन्मदिवसानिमित्त फ्लेक्स फटाके यांचा अनावश्यक खर्च टाळून रक्तदान शिबिराचे आयोजन करून सामाजिक कार्याचा चांगला पायंडा पडला आहे.प्रभू श्रीराम मंदिरासाठी कार सेवक शहीद कोठारी बंधूंचे बलिदान सदैव स्मरणात राहील. असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे.

नालेगाव येथे विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित आयाम व जनकल्याण रक्तकेंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शहिद कार सेवक राम कोठारी व शरद कोठारी,या कोठारी बंधूंनी येथील प्रभू श्रीराम मंदिरासाठी दिलेले बलिदान व विश्व हिंदू परिषदेचे माजी जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे यांच्या जन्मदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते भारत माता पूजन करून करण्यात आले. याप्रसंगी आमदार संग्राम जगताप,स्थायी समिती सभापती किशोर डागवाले,दत्ता मुदगल,अजय चितळे,संतोष गेनाप्पा,भाजपाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, बाबा सानप,मुकुल गंधे,मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,गायत्री परिवाराचे प्रमुख काशिनाथ मोडे, स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळाचे अध्यक्ष विक्रम पाठक,जनकल्याण रक्तकेंद्राचे प्रशासकीय अधिकारी सागर उंडे,स्मिता बडवे,डॉ.गुलशन गुप्ता, डॉ.सौ.गौरी जोशी, डॉ.वसंत झेंडे,डॉ. विलास मढीकर,शरद बळे, दिनेश जोशी, निसर्ग सृष्टी गोपालन संस्थेचे अध्यक्ष वैद्य विलास जाधव, विश्वास बेरड,गौतम कराळे, अग्निशामक दलाचे अधिकारी शंकर मिसाळ,चौपाटी कारंजा मित्रमंडळाचे महेश कुलकर्णी, अमोल भंडारे,सुरेंद्र सोनवणे, नरेंद्र सोनवणे, जितेंद्र लांडगे, लक्ष्मीकांत तरोटे, चंद्रकांत मानकर, हरिभाऊ डोळसे, पैलवान मनोज लोंढे,विकी वाघ,कुमार सुसरे,मयूर मैड,मयूर बोचुघोळ, ज्ञानेश्वर मगर,पोकळे, किरण कुलकर्णी,किरण कुलकर्णी, अरुण खिची, गोकुळ आठरे, कुणाल भंडारी, सुरेंद्र बोराडे, केतन क्षीरसागर,नीरज चांगटे, निलेश मिसाळ,रवी दंडी, डॉ.साळवे,जितेंद्र गांधी, आकाश घोलप,अभिजीत खटावकर, सुनील सरोदे,सुरेश पवार आदींसह जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान,जय जिव्हेश्वर तरुण मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रास्ताविकात मुकुल गंधे म्हणाले, गजेंद्र सोनवणे यांचा जन्मदिवस हिंदू संस्कृती प्रमाणे दरवर्षी सामाजिक व धार्मिक कार्याने साजरा केला जातो.

शहिद कोठारी बंधूंच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला युवकांनी मोठा प्रतिसाद दिला आहे.गजेंद्र सोनवणे यांनी अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिर ट्रस्ट न्यासाचे अहिल्यानगर निधी संकलन अभियान प्रमुख म्हणून महत्त्वाचे कार्य केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# 4 हजार 740 नागरिकांना घरपोच दाखले देण्यात यश

**जिल्हा परिषद, ठाणे:** (समर्थ गांवकरी)

१५० दिवस कृती कार्यक्रम अंतर्गत सामान्य नागरिकांना सरकारी सेवा त्यांच्या दारातच सहज, सुलभ आणि जलदगतीने उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ठाणे जिल्हा परिषदेने एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. 'Door Step Delivery' या अभिनव उपक्रमामुळे जिल्ह्यातील ४३१ ग्रामपंचायतींमध्ये नागरिकांना घरबसल्या शासनाच्या विविध सेवा मिळत आहेत. या प्रणालीद्वारे नागरिकांना घरबसल्या ४०२ प्रकारच्या शासकीय सेवा मिळू शकतात. प्रायोगिक तत्त्वावर सुरू



झालेल्या या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत ५ हजार ११२ अर्ज आलेले असून, ४ हजार ७४० नागरिकांना घरपोच सेवा देण्यात आली आहे. उर्वरित १३८ अपॉईंटमेंटवर काम सुरू असल्याबाबतची माहिती जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांनी दिली. या उपक्रमामार्फत मिळणाऱ्या प्रमुख सेवा व विभाग: मृत्यू दाखला, जन्म दाखला, दारिद्र्यरेषेखालील दाखला, ग्रामपंचायतीचा येणे बाकी नसल्याचा दाखला, विवाह नोंदणी दाखला, नमुना नं ८ चा दाखला (मालमत्ता फेरफार), निराधार योजनेसाठी वयाचा दाखला हे सर्व लोकहक्क सेवा आयोगांतर्गत येणारे हे सात दाखले 'Door Step Delivery' मार्फत देण्यात येत असून त्या व्यतिरिक्त इतर विभागाचे जसे जातीचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, उद्योग आधार, जीवन प्रमाणपत्र, शिष्यवृत्ती अर्ज, पॅनकार्ड व दुरुस्ती, पासपोर्टसाठी शपथपत्र, अधिवास प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, शेत मोजणी अर्ज, चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र, राजपत्र प्रकाशन, १५ वर्षाचे रहवासी प्रमाणपत्र, खाद्य परवाना जीवन प्रमाणपत्र, हयात प्रमाणपत्र, आभाकार्ड (आयुष्यमान भारत आरोग्य खाते), शेत मोजणी अर्ज / Farm Measurement Application, डिश टीव्ही डिटीएच रीचार्ज, शिष्यवृत्ती अर्ज (Scholarship Application), केंद्र सरकार ओबीसी प्रमाणपत्र, वारसा प्रमाणपत्र, GST Form, Hotel Licence, टीकीट आरक्षण, निवासी शाळा, परदेशी शिष्यवृति, शासकीय वसतिगृह प्रवेश, अर्थ कुटुंब सहाय्य, नविन कौटुंबिक शिधापत्रिका, महाभरती, नोकरीसाठी नोंदणी (रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय), भूमिहीन असल्याचे प्रमाणपत्रासाठी अर्ज अशा ४०२ सेवा तर महसूल विभाग, पोलीस/गृह विभाग, भूमि अभिलेख विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, शासन मुद्रण.



श्रीगोंदा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाची निर्मिती करून संपूर्ण देशात समानतेची मजबूत पायाभरणी केली, असे प्रतिपादन नायब तहसीलदार मिलिंद जाधव यांनी केले. ते राहुल विद्यार्थी वस्तीगृह, श्रीगोंदा येथे आयोजित संविधान दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

## थोडक्यात बातम्या...



### थोर समाज सुधारक महात्मा फुले यांचे कार्य समाजासाठी दिशादर्शक : ताठे

अहिल्यानगर (स. गांवकरी) : थोर समाज सुधारक महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणासाठी पुढाकार घेतला. पहिली मुलींची शाळा सुरू केली. स्पृश्य,अस्पृश्य भेद,विधवा विवाह अनेक रूढी परंपरांच्या विरोधात लढा दिला. समाजातील दीनदुबळ्या दलित घटकांसाठी कार्य केले.थोर समाज सुधारक महात्मा फुले यांचे कार्य समाजासाठी दिशादर्शक आहे. महात्मा फुले समता परिषदेचे महानगर जिल्हाध्यक्ष ब्रीजेश ताठे यांनी केले आहे. माळीवाडा येथे थोर समाज सुधारक महात्मा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त अ.भा.म.फुले समता परिषदेच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे,महानगर महानगराध्यक्ष ब्रिजेश ताठे, भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,अर्जुनराव बोरुडे,दत्ताभाऊ गाडळकर,परेश लोखंडे,डॉ.रणजीत सत्रे,मच्छिंद्र फुलसौंदर,राहुल रासकर,मनोज फुलसौंदर,रामदास फुले,रामचंद्र व्यवहारे,ज्ञानेश्वर कविटकर, बजरंग भुतारे,निलेश लाळगे, राहुल रासकर, मच्छिंद्र बनकर,बजरंग भुतारे, ज्ञानेश्वर काविटकर,गणेश कोल्हे, रमेश चिपाडे, राजेंद्र पडोळे, अनिल इवळे,कॅप्टन सुधीर पुंड आदी उपस्थित होते.

### कुंडलवाडी न. प. प्रभाग ३ मध्ये पत्रकार भोसीकर यांना उत्स्फूर्त प्रतिसाद

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक २०२५ निवडणूक बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी नगर परिषद प्रभाग क्रमांक तीन मध्ये उच्च शिक्षित गोरगरीब जनतेच्या मदतीला कार्यतत्पर असणारे व लोकशाहीचा चौथा आधारस्थंभ म्हणून अन्याय अत्याचार विरुद्ध वाचा फोडणारे जयवर्धन नागोराव भोसीकर हे अनुसूचित जाती प्रवर्गातून शिवसेना शिंदे गटाकडून निवडणूक लढवीत असून त्यांच्या या सामाजिक कार्यामुळे मतदाराकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. येत्या २ डिसेंबरला होणाऱ्या निवडणुकीसाठी ज्या -त्या पक्षाची शहरात जोरदार रणधुमाळी चालू असून यावेळी कुंडलवाडी नगर परिषदेसाठी भाजप, राष्ट्रवादी कांग्रेस, कांग्रेससह शिवसेना शिंदे गटही नगर अध्यक्ष पदासह १४ नगरसेवक पदासाठी आपले उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले आहे.यात प्रमुख लढत भाजपा, राष्ट्रवादी कांग्रेसमध्ये होत असलीतरी शिवसेना शिंदे गटाचे पॅनल प्रमुख डॉ. सायन्ना शेंगुलवार हे नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लढवीत आहेत. यामुळे ही निवडणूक भाजप, राष्ट्रवादी कांग्रेससाठी सोपी नसून इथे डॉ. सेनगुलवार याचा धबदबा कायम असल्याचे दिसून येते. याबरोबर प्रभाग क्रमांक ३ मध्येही उच्च शिक्षित अभ्यासू गोरगरिबांच्या अडीअडचणीत तत्परतेने धावून जाणारे जयवर्धन भोसीकर हे अनुसूचित जातीच्या आरक्षित जाग्यावर निवडणूक लढवीत आहेत. त्यांच्या या सर्व गुण संपन्न स्वभावामुळे प्रभाग क्रमांक ३ मधून त्यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे.

### १ डिसेंबर पर्यंत प्रचार करता येणार तसेच २ डिसेंबर मतदानासाठी सुट्टी जाहीर

आळंदी (स. गांवकरी) : राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे नगरपरिषद व नगरपचांयतीच्या सार्वत्रिक निवडणूकीकरिता २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान सुरु होणार असून प्रचार १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजता बंद करण्यात यावे ; प्रचार बंद झाल्याच्या वेळेपासून सभा, मोर्चे, ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही तसेच निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरात प्रसिध्दी, प्रसारण देखील बंद करावे. जिल्ह्यातील उमेदवारांनी आयोगाच्या निर्देशाचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. नगरपरिषद व नगरपचांयतीच्या सार्वत्रिक निवडणूकीकरिता २ डिसेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी नगरपरिषद व नगरपचांयतीच्या सार्वत्रिक निवडणूकीत पात्र मतदारांना मतदान करता यावे याकरिता २ डिसेंबर २०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. जिल्ह्यातील आळंदी, बारामती, भोर, चाकण, दौंड, फुरसुंगी-उरळी देवाची, इंदापूर, जेजुरी, जुन्नर, लोणावळा, माळेगाव बुद्रुक, मंचर, राजगुरुनगर, सासवड, शिरूर, तळेगाव दाभाडे आणि वडगाव या नगरपरिषद व नगरपचांयतीच्या मतदार संघात सुट्टी असणार आहे.

### लोणी व्यंकनाथ येथे बिबट्याची दहशत थांबता थांबेना गाईचा घेतला बळी

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथे बिबट्याची दहशत काही थांबता थांबेना तीन ते चार दिवसांमध्ये बिबट्या कडून जनावरांचा अमानुष बळी घेतला जात आहे. त्यामध्ये बुधवारी रात्री दहा वाजल्याच्या सुमारास बिबट्यांनी लोणी व्यंकनाथ येथील अल्पभूधारक शेतकरी शहाजी विष्णू काकडे यांच्या दुभती गाईवर हल्ला करून बळी घेतला आहे. गाईची किंमत जवळपास 50 हजाराच्या पुढे असल्याचे संबंधित शेतकऱ्यांनी सांगितले. गेल्या एक वर्षापासून लोणी व्यंकनाथ परिसरात बिबट्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेळ्या, मेंढ्या, कुत्री, पाळीव जनावरे यांच्यावर हल्ला करून बळी घेतले आहेत. वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देखील या परिसरात जागोजागी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरे लावले.

# गरिबीतून श्रीमंत होण्याचा एकच मार्ग फक्त शिक्षण घेणे : न्यायमुर्ती न्याहारकर

## योग्य वेळी मार्गदर्शन मिळाले तर आयुष्य घडते-ए.पी.आय.किशोर पवार : सर्वोदय विद्यालयात कायदे विषयक शिबीर संपन्न

**राजूर :** (समर्थ गांवकरी)

परिस्थिती माणसाला जीवन जगायला शिकवते.जेव्हा सगळे साथ सोडतात तेव्हा आयुष्याची लढाई सुरू होते.गरिबिची कारणे शोधा.गरिबितून श्रीमंत होण्याचा एकच मार्ग फक्त शिक्षण घेणे.असे प्रतिपादन दिवाणी न्यायाधीश एस.यू.न्याहारकर यांनी केले.

तालुका विधी सेवा समिती अकोले,राजूर न्यायालय तसेच अकोले,राजूर वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत कायदे विषयक शिबीर गुरुवर्य रा.वि. पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजूर येथे संपन्न झाले. यावेळी न्यायमुर्ती न्याहारकर विचार मंच्यावरून बोलत होते.




याप्रसंगी सत्यनिकेतन संस्थेचे सचिव एम.एल.मुठे,संचालक विजय पवार,राजूर पोलीस स्टेशनचे ए.पी.आय. किशोर पवार, ॲड. दत्तात्रय निगळे,सामाजीक कार्यकर्ते विनय सावंत,कनिष्ठ लिपीक एस.ए.शिंदे,डी.सी.उदागे, वरिष्ठ लिपीक एस.डी.पानसंबळ,सहाय्यक सरकारी वकील एस.वाय.वाकचौरे, तालुका वकील संघाचे सदस्य टी.टी.पवार,गवांदे मॅडम, दिघे मॅडम उपस्थित होते. न्यायमुर्ती न्याहारकर यांनी पुढे मार्गदर्शन करताना अपयश आले खचून जाऊ नका.काळ येतो,जातो.रात्री नंतर दिवस येतो.स्वतःच्या चुका लपवू नका.वेदनांना आपली ताकद बनवा. प्रेम प्रासंगीक असावे. मैत्री

> कष्टाची जाणीव असावी.भारतीय राज्यघटनेने व्यक्ती स्वातंत्र्य दिले. पण मर्यादा आहेत.पळून जाण्यापुर्वी एकदा आई वडीलांचा विचार करा. जोडीदार योग्य निवडा.ज्यांनी आपल्यासाठी खस्ता खाल्यात त्यांचा विश्वासघात करू नका. **- विनय सावंत**
>
> वयाचा विचार महत्त्वाचा असून बालविवाह थांबवा.बंधन पाळा. जबाबदारीचे भान ठेवा. कुटूंब उद्ध्वस्त करू नका. घरच्यांना दुखवू नका,शिक्षेस पात्र ठरू नका. **-ॲड. दत्तात्रय निगळे**

अभ्यासपुर्ण असावी.महिलांचा आदर करा.असे प्रतिपादन केले.

ए.पी.आय.किशोर पवार यांनी तरुण वर्ग भरकटत चालला आहे. मोबाईलचा अतिवापर टाळा. कामाची लाज वाटू देवू नका. जीवनात ध्येय ठरवा. क्षेत्र योग्य निवडा. तुमची काळजी तुम्ही घ्या. वयाची मर्यादा बाळगा. स्वतःच्या पायावर उभे रहा.योग्य वेळी मार्गदर्शन मिळाले तर आयुष्य घडते असे विचार प्रतिपादीत केले.

यावेळा विनय सावंत, ॲड. दत्तात्रय निगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य भाऊसाहेब बनकर यांनी केले. सुत्रसंचालन शरद तुपविहिरे यांनी केले.तर उपप्राचार्य दिपक बुऱ्हाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मेनिंजायटीस लसीकरणाद्वारे तरुणांचे जीवन वाचवणे

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

ब्रेन फीव्हर म्हणून ओळखला जाणारा मेनिंजायटिस हा लसीकरणाद्वारे टाळता येणारा गंभीर संसर्ग आहे, जो विशेषतः लहान मुलांसाठी मोठी आरोग्याची चिंता आहे. वर्ल्ड मेनिंजायटिस डे दरवर्षी 5 ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. याचा उद्देश या आजाराबाबत जनजागृती करणे, लवकर निदानाचे महत्त्व अधोरेखित करणे आणि लसीकरणाद्वारे या आजाराची प्रतिबंधात्मक शक्यता वाढवणे हा आहे. दरवर्षी जगभरात २.५ दशलक्षांपेक्षा अधिक मेनिंजायटिसची प्रकरणे



नोंदवली जातात. या आजारामुळे मृत होणाऱ्यांपैकी जवळपास ७० टक्के मुले पाच वर्षांखालील असतात, यामुळे हा गंभीर जागतिक आरोग्यसंकट बनले आहे.

# पावसाचं मोठं संकट, पुढचे ५ दिवस धोक्याचे, हाय अलर्ट

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

सेन्यारनंतर पुन्हा एकदा एक नवं चक्रीवादळ आता बंगालच्या उपसागरात तयार झालं आहे, या चक्रीवादळ्याच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा हवामान विभागाकडून पावसाचा इशारा देण्यात आला आला आहे. देशासह राज्यात यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे, अनेक राज्यांना पावसानं झोडपून काढलं आहे. पावसामुळे अनेक राज्यांमध्ये मोठं नुकसान झालं आहे. महाराष्ट्राला देखील यावर्षी पावसाचा चांगलाच तडाखा बसला, महाराष्ट्रात पावसामुळे मोठं नुकसान झालं. चक्रीवादळ सेन्यारनंतर पुन्हा एकदा एक नवं चक्रीवादळ बंगालच्या

> चक्रीवादळ डिटवाहच्या पार्श्वभूमीवर तामिळनाडूमधील काही जिल्ह्यांमध्ये चेन्नई तसेच आध्र प्रदेशच्या किनारी भागांमध्ये जोरदार पावसाची शक्यता असून, हवामान विभागाकडून या प्रदेशांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे, मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.दक्षिण भारतामधील काही राज्यांमध्ये पुन्हा पावसाची शक्यता आहे. दरम्यान दुसरीकडे उत्तर भारतात मात्र थंडीचा कडाका आणखी वाढण्याची शक्यता आहे, मध्य भारतात देखील थंडी वाढण्याची शक्यता आहे, महाराष्ट्रात हवामान विभागाकडून कोणताही पावसाचा इशारा देण्यात आलेला नाही, मात्र सरासरी तापमानाता घट होऊन पठारी प्रदेशात थंडीची लाट पहायला मिळू शकते असा अंदाज आहे.

उपसागरात तयार झालं आहे.या चक्रीवादळाला डिटवाह असं नाव देण्यात आलं आहे, यमन देशानं या चक्रीवादळाला हे नाव दिलं आहे. या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा देशातील काही भागांमध्ये जोरदार पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार हे बंगालच्या उपसागरात निर्माण झालेलं चक्रीवादळ तीस नोव्हेंबरपर्यंत तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यावर पोहोचण्याची शक्यता आहे. हवामान विभागनं दिलेल्या माहितीनुसार चक्रीवादळ सेन्यारचे रुपांतर हे निकोबर बेटाच्या उत्तरेला ८५० किलोमीटर अंतरावर आता कमी दाबाच्या पट्ट्यात होण्याची शक्यता आहे. मात्र दुसरीकडे आता आणखी एक चक्रीवादळाची निर्मिती झाली आहे, चक्रीवादळ डिटवाह हे आता उत्तर -पश्चिमेकडे सरकत असून ते ३० नोव्हेंबरपर्यंत तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यावर पोहोचण्याची शक्यता आहे. या चक्रीवादळाचा परिणाम म्हणून दक्षिणेकडील काही राज्यात जोरदार पावसाची शक्यता आहे.

# अकोल्यात महात्मा ज्योतिराव फुले यांना अभिवादन



**अकोले :** (समर्थ गांवकरी)

अकोले शहरात सावित्रीबाई फुले वाचनालय अकोले व अकोले तालुका ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले चौकात महात्मा ज्योतिराव फुले पुण्यतिथी साजरी करण्यात आली यावेळी नगरपंचायतीचे मा.नगरसेवक, अगस्ति पतसंस्थेचे संचालक प्रमोद मंडलीक म्हणाले महात्मा फुलेंनी शैक्षणिक, सामाजिक वंचितांसाठी मोठे योगदान दिले आहे. महात्मा जोतिराव व सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भिडेवाडा येथे १ जानेवारी १८४८ रोजी भारतातील मुलींची पहिली शाळा सुरु केली आणि स्त्री मुक्तीची पहाट झाली हा क्षण इतिहासात नोंदला गेला. तसेच त्याकाळी महात्मा फुले यांनी मुंबई, पुणे आदींसह अनेक शहरात मोठमोठ्या इमारतींचे केलेले बांधकाम आजही चांगल्या स्थितीत दिमाखदार उभे आहेत. आज शिक्षणाची काय स्थिति परिस्थिती आहे शिक्षण व्यवस्थेची आपण पाहत आहोत शिक्षणाचा धंदा, महागडे शिक्षण सर्व सामान्यांना न परवडणारे झाले आहे.

> याप्रसंगी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे म्हणाले, की शेतकरी आणि बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेऊन पुरोगामी विचारांची मांडणी करणारे आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. सत्यशोधक समाजाची स्थापना करणारे आणि आपले संपूर्ण आयुष्य समाजासाठी वेचणाऱ्या महात्मा फुले यांना जनतेने "महात्मा" पदवी बहाल केली. त्यांचे विचार आणि कार्य आपना सर्वांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहील असे त्यांनी सांगितले. यावेळी ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, तालुका अध्यक्ष दत्ता शेणकर, बबनराव तिकांडे, साई डेअरीचे संचालक केशवराव नवले, प्रवरा पतसंस्थेचे मा.चेअरमन वसंतराव बाळसराफ, रामदास पांडे, कारभारी बंदावने, प्रसाद भालेराव, राम रुद्रे, दिलीप मंडलिक, किरण चौधरी, दत्ता ताजणे, रमेश नाईकवाडी, भाऊसाहेब नाईकवाडी, बाळासाहेब भांगरे, सुरेश गायकवाड, सुभाष मंडलिक, अनिल गायकवाड,किसन गायकवाड, रमेश बाळसराफ, सुदाम मंडलीक, सखाराम खतोडे आदी उपस्थित होते सुत्र संचालन रामदास पांडे यांनी केले किसन गायकवाड यांनी आभार मानले.

# लोणी व्यंकनाथ येथे बिबट्याची दहशत थांबता थांबेना गाईचा घेतला बळी

## शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण, वन अधिकाऱ्यांकडून तात्काळ दखल

**श्रीगोंदा तालुका :** (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथे बिबट्याची दहशत काही थांबता थांबेना तीन ते चार दिवसांमध्ये बिबट्या कडून जनावरांचा अमानुष बळी घेतला जात आहे. त्यामध्ये बुधवारी रात्री दहा वाजल्याच्या सुमारास बिबट्यांनी लोणी व्यंकनाथ येथील अल्पभूधारक शेतकरी शहाजी विष्णू काकडे यांच्या दुभती गाईवर हल्ला करून बळी घेतला आहे. गाईची किंमत जवळपास 50 हजाराच्या पुढे असल्याचे संबंधित शेतकऱ्यांनी सांगितले. गेल्या एक वर्षापासून लोणी व्यंकनाथ परिसरात बिबट्याने




अनेक शेतकऱ्यांच्या शेळ्या, मेंढ्या, कुत्री, पाळीव जनावरे यांच्यावर हल्ला करून बळी घेतले आहेत. वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देखील या परिसरात जागोजागी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरे लावले. परंतु बिबटे मात्र हुलकावणी देत आहेत. वारंवार जागा बदलत आहेत. दिवसभर बिबटे इतरत्र ज्या ठिकाणी दडण आहे. तिथे दिवसा आराम घेतात. आणि रात्री भक्षणासाठी वाड्या वस्त्यांवर तसेच गावात येऊन जनावरे, शेळ्या, पाळीव कुत्री इत्यादींवर हल्ला करून बळी घेत आहेत. या बिबट्याच्या दहशतीमळे लोणी व्यंकनाथ परिसरामध्ये शेतकऱ्यांसह शेतमजूर इत्यादींमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सध्या या बिबट्याच्या दहशतीमुळे शेत मजूर देखील या परिसरात कामावर येण्याचे धाडस करत नाही त्यामुळे शेतीची देखील आर्थिक दृष्ट्या वाताहात होताना दिसत आहे असे शेतकऱ्यांकडून सांगितले जात आहे. दरम्यान एकीकडे चालू वर्षी अतिवृष्टीमुळे रब्बी हंगामातील पिके निस्तानाबूत झाली आहेत. वर्षभराचे मिळणारे उत्पन्न या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पदरी मात्र घोर निराशा झाली. शेतकरी सध्या असमानी संकटात आहे. अशा या परिस्थितीतून शेतकरी वाटचाल करत असतानाच बिबट्यांकडून मात्र जनावरे व माणसावर देखील हल्ले होताना दिसत आहे. सद्यस्थितीत शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून दूध व्यवसायाकडे लक्ष केंद्रित करत असून, सेवा संस्था बँकांकडून कर्ज काढून गाई म्हशी खरेदी करत आहेत. त्यातून कुटुंबाचा उदरनिर्वाह होत असतानाच आता या दुभत्या गाईंवर देखील बिबट्यांकडून अमानुषपणे हल्ले होत आहेत. राज्य सरकारने तातडीने बिबट्यांची वाढलेली संख्या लक्षात घेता व शाळकरी मुले, शेतमजूर, शेतकरी इत्यादींच्यावर बिबट्यांकडून हल्ले व बळी रोखण्यासाठी तातडीने कायद्यात बदल करून बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होताना आहे.

लोणी व्यंकनाथ येथे बिबट्याकडून जनावरांचा बळी घेतल्याच्या घटनेची माहिती संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी श्रीमती दिपाली भगत मॅडम यांच्याशी नुकसानग्रस्त शेतकरी व पत्रकार नंदकुमार कुरुमकर यांनी माहिती दिली. या गंभीर घटनेची तातडीने दखल वनपरिक्षेत्राधिकारी श्रीमती दिपाली भगत मॅडम यांनी वनरक्षक रंजना घोडके व वनकर्मचारी संभाजी शिंदे यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. यावेळी नुकसानग्रस्त शेतकरी शहाजी काकडे, वृक्षमित्र प्राचार्य बाळासाहेब जठार आदी यावेळी उपस्थित होते.

# भाजप, मोदींशी कसे लढता येईल?



## संपादकीय

लोकशाहीचा डोलारा आवाज करत कोसळत नसतो. तिला आव्हान देणारे लढायचे कसे ते विसरतात तेव्हा ती आवाज न करता ऱ्हास पावते. बिहारचा निकाल हा इंडिया आघाडीला सणसणीत चपराक लगावणारा होता. बलाढ्य भाजपचा सामना करू शकेल असा सक्षम विरोधी पक्ष भारतात सध्या उरलेला नाही. ही पोकळी भयावहरीत्या वाढते आहे. एकेकाळी पत्रकार परिषदा आणि समाजमाध्यमातून आरडाओरडा पुरेसा नसे. रक्त सांडून, तुरुंगात जाऊन, त्याग करून आणि व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेपेक्षा मोठी ध्येय बाळगून सत्ताधाऱ्यांना विरोध केला जात असे. इंदिरा गांधी यांच्या सत्तेने कायदेशीर, राजकीय आणि नैतिक आव्हाने अंगावर घेतली तेव्हा त्या अजेय भासत असत, तरीही रस्त्यावर उभ्या राहिलेल्या चळवळीने त्यांच्यासमोर आव्हान उभे केले. जयप्रकाश नारायण या अशक्त वयोवृद्ध नेत्याला कोणत्याही पदाची अभिलाषा नव्हती. हाती काही नसताना केवळ नैतिक बळावर त्यांनी इतिहास निर्माण केला. समाजवादी, साम्यवादी, पुराणमतवादी असे सारे नेते, शेतकरी संघटना, कामगार संघटना, विद्यार्थी, आडदांड प्रादेशिक सेनापती या सगळ्यांची मोट बांधून त्यांनी एक राजकीय साम्राज्य उद्ध्वस्त करणारी शक्तिशाली लाट निर्माण केली. याच्या उलट आजचे विरोधी पक्षाचे नेते वागतात. लोकहिताचे राखणदार होण्याऐवजी खासगी राजकीय उद्योगाचे भागधारक असल्यासारखे बहुतेकांचे वर्तन असते. इंडिया आघाडीतील बहुतेक वाटाघाटी या समोर ठेवलेल्या ध्येयासाठी नव्हे, तर जागांसाठी झाल्या. विरोधकांनी आपापले सवते सुभे वाटून घेतले.

८० च्या दशकात राजीव गांधींच्या लोकप्रियतेला धडक देत विश्वनाथ प्रताप सिंग यांनी बंड केले. देवीलाल, मुलायमसिंह यादव, महामार्ग अडवू शकतील असे शेतकरी, शहरांमधील चौकात रात्रीतून जमतील असे सामाजिक संघटक त्यांच्याबरोबर होते. तामिळनाडूतील एम. करुणानिधी किंवा आंध्रातील एन. टी. रामाराव, बंगालमध्ये ज्योती बसू यांच्या सारख्यांना 'आमच्याकडे लक्ष द्या' असे देशाला सांगावे लागले नाही. प्रचंड लोकप्रियतेमुळे मिळालेला



जनमानसाचा पाठिंबा आणि देशभर असलेली ओळख यातून त्यांनी हे साधले. त्यांनी त्यांची त्यांची राज्ये समर्थपणे सांभाळली. गरज वाटली तेव्हा राष्ट्रीय राजकारणाशी हातमिळवणी केली. आजमितीला भारतीय राजकारणाला नेत्यांच्या दुष्काळाने ग्रासले आहे. नेते आहेत, पण त्यांना वजन नाही. घोषणा आहेत, पण त्यात चमक नाही. डाव्यांची घसरण झाल्यामुळे वैचारिक मंथन विरळ झाले आहे. एकेकाळी हरियाणा आणि पंजाब गाजवणारे चौताला आणि बादल अंतर्धान पावले आहेत. ममता बॅनर्जी अध्येमध्येच लढायला उतरतात. के. चंद्रशेखर राव फक्त तेलंगणाच्या अस्मितेबद्दल बोलतात. अखिलेश यादव एखाद्या जहागिरीसारखे उत्तर प्रदेशचे रक्षण करू पाहतात; परंतु मोठ्या आघाडीचे नेतृत्व टाळतात. आम आदमी पक्ष स्वतःचा ब्रॅण्ड पक्का करण्याच्या मागे असतो, पण एका छत्रीखाली यायला नकार देतो. प्रत्येक नेत्याला ऐक्य हवे आहे; पण त्याच्या व्यक्तिगत झेंड्याच्या खाली. या पोकळीत भाजप विनासायास आपला एकछत्री अंमल गाजवतो आहे. अशा प्रकारच्या एकपक्षीय वर्चस्वाचे परिणाम गंभीर आहेत.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ५०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | 9 | 3 | 7 | | | 6 | |
| | | 3 | | 1 | | | | |
| | 6 | 1 | | 5 | | | | 2 |
| | 1 | | 7 | 2 | | | | 9 |
| 6 | 9 | 2 | | | | 1 | 5 | 7 |
| 3 | | | | 9 | 6 | | 8 | |
| 2 | | | | 8 | | 5 | 7 | |
| | | | | 6 | | 4 | | |
| | 7 | | | 3 | 4 | 9 | 2 | |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ४९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 6 | 5 | 1 | 7 | 3 | 9 | 2 |
| 1 | 9 | 7 | 2 | 3 | 4 | 8 | 6 | 5 |
| 2 | 5 | 3 | 8 | 9 | 6 | 7 | 1 | 4 |
| 3 | 1 | 8 | 4 | 5 | 9 | 6 | 2 | 7 |
| 5 | 7 | 9 | 6 | 2 | 3 | 1 | 4 | 8 |
| 4 | 6 | 2 | 7 | 8 | 1 | 9 | 5 | 3 |
| 7 | 2 | 1 | 9 | 4 | 8 | 5 | 3 | 6 |
| 9 | 8 | 4 | 3 | 6 | 5 | 2 | 7 | 1 |
| 6 | 3 | 5 | 1 | 7 | 2 | 4 | 8 | 9 |

उत्तर उद्याच्या अंकात

२९ नोव्हेंबर २०२५
शनिवार
विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७
संवत्सर – विश्वावसूनाम

अयन- दक्षिणायान
मास- मार्गशीर्ष
ऋतु- सौर हेमंत
शुक्ल पक्ष
तिथि:नवमी २३:१५:२२
नक्षत्र:पूर्वाभाद्रपद

२६:२२:१९+
योग:हर्षण ०९:२६:३५
करण:बालव ११:५१:१८
करण:कौलव २३:१५:२२
सूर्य:वृश्चिक
चन्द्र:मीन२०:३३:२०

## उपदेशाचे डोस

### विश्वासाचा सुगंध

चित्तरंजन हे अतिशय हुशार परंतु कट्टर नास्तिक गृहस्थ म्हणून सर्वजण त्यांना ओळखत. म्हणूनच सहदेव महाराजांच्या कीर्तनाला त्यांना आलेले पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले. सहदेव महाराज तर धर्माची, ईश्वराच्या अस्तित्वाची महती सांगणारे. आणि अशा धार्मिक विषयाशी संबंधित कार्यक्रमाला चित्तरंजन कसे काय आले ? हे कसे काय शक्य आहे ? म्हणून सर्वत्र मित्र काहीसे अचंबितच झाले. त्यांच्यापैकी एकाला न राहवल्याने त्याने अखेर चित्तरंजन यांना विचारलेच, '' भक्तिमार्गाची प्रवचने, कीर्तने ऐकायला जाणे आपल्याला पटते का ? आपल्या तत्त्वात ते बसते का ? नसेल तर आज येथे येण्याचे कारण काय ?''

चित्तरंजन म्हणाले, '' त्याचे असे आहे की, सहदेव महाराज आपल्या प्रवचनात जे सांगतात, त्यावर माझा मुळीच विश्वास नाही. परंतु आपण जे जे बोलतो, त्यावर महाराजांचा दृढ विश्वास आहे. आणि ज्याचा स्वतःच्या बोलण्यावर दृढ विश्वास आहे, अशा व्यक्तीचे बोलणे समजून घ्यायला मला आवडते.''

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९३७ – इंग्लंडमध्ये ९९९ हा दूरध्वनी क्रमांक फिरवून थेट स्कॉटलंड यार्डशी संपर्क साधला येईल, अशा व्यवस्थेची सुरुवात. पुढे ही पद्धत जगातील बहुतेक सर्व देशांत पसरली.

### राष्ट्रीय

- १९६१ – पहिले अवकाशप्रवासी युरी गागारीन यांचे भारतभेटीसाठी दिल्लीत आगमन.
- २००६ – उत्तर प्रदेशच्या कानपूरमध्ये बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा तोडण्यावरुन तणाव निर्माण झाला. संतप्त लोकांनी तोडफोड करुन ठिकठिकाणी जाळपोळ केली.

### जन्म

- १८०३ – ख्रिस्तियन योहान डॉप्लर, ध्वनिशास्त्रज्ञ.
- १८३२ – लुईसा मेरी अलकॉट, साहित्यक व समाजसेवीका.
- १८३९ – ठक्करबाप्पा अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर, गुजरातमधील समाजसुधारक.
- १८७४ – सन १९४९ चे वैद्यकाचे नोबेल पारितोषिक मिळविणाऱ्या अंतोनियो मेनिझ यांचा जन्म. मेंदूतील गाठी शोधण्यासाठी त्यांनी सेरेब्रल ऍंजिओग्राफी' हे तंत्र निर्माण केले.
- १९३६ – युआन ली, सन १९८६ चे रसायनशास्त्राचे नोबेल मिळविणारे अमेरिकी शास्त्रज्ञ.

### निधन

- १७८० – मारिया थेरेसा, ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याची साम्राज्ञी.
- १९२६ – कृष्णाजी नारायण आठल्ये, केरळ कोकीळचे संस्थापक-संपादक.
- १९३९ – माधव ज्युलियन-माधव त्र्यंबक पटवर्धन यांचे निधन.
- १९५० – बाया कर्वे, महर्षी अण्णासाहेब कर्वे यांची पत्नी.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ५०



### आडवे शब्द

१. '....... नको धुंद वारे, नको चांदण्या या' सुधीर फडके यांचे एक भावगीत
९. संगीतसभा, मैफल
१०. कवितेतेली 'तुझे'
१२. 'आ'काराची उभी रेघ
१३. पुरणे, गाडणे
१४. अगम्य, कळण्यास कठीण
१६. पाणी
१८. नातेवाईक
१९. वरचढ, अधिक चांगल्या प्रतीचे
२१. योग्य
२२. पंढरपूरचे दैवत
२४. प्रेत
२६. बासरी
२७. शिक्षा
२९. कशा प्रकारचा?
३०. भयानक
३१. समुद्र
३४. सरोवर
३६. सोटा, 'घी देखा' लेकीन --- नही देखा
३७. अत्यंत तलम कापड
३९. खवा परतून केलेला गोड पदार्थ
४१. फरक, तफावत
४२. बालंट, आळ
४३. वाकबगार
४६. चित्रपट
४२. अर्धी ओंजळ
५१. अंतराळ
५२. पंख, दुसऱ्याचे
५४. चटकन, भरभर
५७. विपुलता
५९. जुगार
६०. अंत:करण
६१. जेव्हा
६३. कर्जाचा बोजा, वजन
६४. लबाडी, कारस्थान
६५. चेहरा, मुख
६९. खेप, यात्रा
७०. जंगलात लागलेली आग
७१. राक्षस
७२. सरस्वतीचे एक नाव
७४. नमस्कार
७५. पर्ण, विडा
७६. घराणे
७८. कलावंत
७९. उपयोग
८०. पोरका
८१. सरसहा, भीडभाड न ठेवता

### उभे शब्द

२. वेदना, त्रास
३. आलेला-गेलेला माल
४. प्रतिष्ठित
५. 'तुम्हावर केली मी मर्जी बहाल, -- सोडून जाऊ रंगमहाल (पिंजरा)
६. सेनापती
७. टिंगल, चेष्टा
८. हिंदीत लक्षात राहण्याजोगे
९. जाहीर सभा (हिंदी)
१०. प्रामाणिक, सोज्वळ
१४. पुष्कळ वेळा
१५. शक्यतेप्रमाणे
१७. रविवासर
१८. कमीज बोरबरचे वस्त्र
२०. श्रीमंत (हिंदी)
२३. पाषण
२५. पृथ्वीचा तळ
२६. स्वयंपाकाचे शास्त्र
२८. जादू करणारा
३२. खोडण्याचे साधन
३३. आजच्या आधीचा दिवस
३५. सुखी माणसाचा वस्त्रविशेष!
३७. मखर
३८. सहाय्य
३९. गुरांचा घोळका
४०. श्रीकृष्णाचा मामा
४१. साचलेली घाण, घाणीचा थर
४४. परमेश्वर
४५. ओळख
४७. अटीची भाषा
४८. राखण करणारा
५०. झाडाची त्वचा
५१. काजळ, सुरमा इ.प्रकार
५३. जहाजाचे लुटारू
५५. वस्त्र, कापड
५६. ओटा
५७अ. लाख
५८. मीठ
६२. घरोघर
६३. नशीबवान
६६. रोग्याला तपासून औषध देण्याची जागा
६७. आंबट गोड काटेरी फळ
६८. कशासाठी
६९. चणचण
७०. अरण्य
७१. मोठा भाऊ
७३. वर्तमानपत्रातील कप्पा
७५. झाडाभोवतीचा चबुतरा
७७. नाकावरील मोत्याचा दागिना
७८. सत्व

उत्तर उद्याच्या अंकात

### शब्दकोडे क्र. ४७ चे उत्तर

आडवे उत्तर : १.हकनाक ५.पदोपदी ८.मनमुराद ११.डरकाळी १२.सान १३.वास १५.दारोदार १७.दशानन १९.पखाल २०.सुसर २१.तनया २३.बारका २५.नाग २६.पापा २७.खाज २९.काळ ३०.पट ३२.परीक्षक ३५.पगार ३८.कडकडाट ४१.मादक ४३.नाराज ४४.कर ४५.रुपाया ४७.साकव ४९.शव ५०.कापरा ५१.कचरा ५४.तडतड ५६.सल ५८.नागरिक ६०.शनि ६२.बार ६३.पर्व ६५.जरतर ६७.वेळापत्रक ६९.अळमटळम ७०.जवळ ७२.खारट ७४.पनीर ७५.कसदार ७७.सण ७८.कमळ ८०.दादला ८१.टीका ८२.दार ८३.खडावा ८४.मानपान ८६.काल ८८.रणगाडा ८९.लीनता ९०.परतविणे

उभे उत्तर : १.हडळ २.कर ३.नाका ४.कळीदार ५.पडदा ६.पसा ७.दीनदयाळ ८.मदनबाण ९.मुका १०.दवाखाना १४.सलग १६.रत १८.नर २०.सुपारी २२.नकार २४.कापडचोपड २६.पापभीरू २८.जप ३१.टक ३३.क्षमायाचना ३४.कद ३६.गाढव ३७.ऐरावत ३९.डाक ४०.टरफल ४२.कसा ४३.नाश ४६.पाक ४८.कनक ५०.कातरवेळ ५२.राग ५३.बेशरम ५५.डबा ५६.सर्वत्र ५७.जीव ५९.रिकामटेकडा ६१.नित ६३.पपनस ६५.जळजळ ६६.रजनी ६८.कसर काढणे ६९.अट ७१.वरदान ७२.खासदार ७३.रणरण ७४.पवन ७५.कलाकार ७६.दाटी ७९.मवाली ८३.खडा ८४.माता ८५.पाड ८७.लता

# पश्चिम विभागाची 2025 मध्ये निवृत्तीसाठी सज्जतेत आघाडी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



ऑक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लिमिटेड ने आपल्या प्रमुख निवृत्ती सर्वेक्षण असलेल्या इंडिया रिटायरमेंट इंडेक्स स्टडीच्या (आयरिस) पाचव्या आवृत्तीचे पश्चिम विभागातील निष्कर्ष जाहीर केले. त्यातून असे दिसून येते की भारताचा पश्चिम विभाग उर्वरित देशांपेक्षा निवृत्तीसाठी जास्त तयार आहे. येथील निवृत्ती निर्देशांक ५० असून राष्ट्रीय सरासरी ४८ पेक्षा दोन गुणांनी जास्त आहे. आयआरआयएस सर्वेक्षण जगातील आघाडीची मार्केटिंग डेटा आणि विश्लेषण कंपनी कंटार यांच्या भागीदारीत केले जाते. ते ० ते १०० च्या स्केलवर शहरी भारतातील निवृत्ती तयारीचे मूल्यांकन करते. आर्थिक तयारी, आरोग्य तयारी आणि भावनिक तयारी या तीन महत्त्वाच्या निर्देशांकांमध्ये हा स्कोअर निश्चित केला जातो.

ऑक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुमित मदन म्हणाले: पश्चिम भारतातील निष्कर्ष सकारात्मक गती दर्शवतात. निवृत्ती गुंतवणुकीचे प्रमाण २०२२ मध्ये ६२ टक्के होते ते २०२५ मध्ये ७२ टक्क्यांपर्यंत वाढले असून जे राष्ट्रीय ट्रेंडपेक्षाही पुढे आहे. हे जागरूकतेपासून निर्णायक कृतीकडे होणारा स्पष्ट बदल दर्शवते. निवृत्ती नियोजन वैयक्तिक निवडीऐवजी सामाजिकदृष्ट्या मान्यताप्राप्त आदर्श बनत आहे. शिफारशींवर आधारित ९१ टक्के नियोजन आणि वैयक्तिक आकांक्षा आणि कौटुंबिक गरजांशी जोडलेल्या प्रेरणांसह निर्णय विश्वासाई नेटवर्कद्वारे घेतले जातात. ही सामूहिक मानसिकता श्रेणीतील वाढीसाठी मोठी संधी निर्माण करते कारण विमा कंपन्या फक्त उत्पादनकेंद्री संवादावर अवलंबून राहण्याऐवजी अभिप्रायानुसार काम करतात. पश्चिम भारतात आरोग्याबाबत तयारीला लोकप्रियता मिळत आहे. आरोग्य निर्देशांक ४२ वरून ४७ पर्यंत वाढला आहे. ७९ टक्के प्रतिसादकर्त्यांचा असा विश्वास आहे की ते आपल्या निवृत्तीच्या काळात निरोगी आणि तंदुरुस्त राहतील. त्याला नियमित आरोग्यावर जास्त भर दिल्यामुळे पाठबळ मिळाले आहे. दैनंदिन शारीरिक हालचालींमध्ये झपाट्याने वाढ झाली असून ४५ टक्के लोकांचा असा दावा आहे की ते जवळजवळ दररोज वेगवेगळ्या प्रकारचे व्यायाम करतात. ही पूर्वीच्या ३६ टक्क्यांपेक्षा लक्षणीय सुधारणा आहे. याशिवाय आरोग्य विम्याची मालकी १४ गुणांनी वाढली आहे आणि आरोग्य ॲप्स आणि न्यूट्रास्युटिकल सप्लिमेंट्स अशा आरोग्यदायी वर्तनांमध्ये वाढ होत आहे.



तामसा - राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण हिमायतनगरच्या प्रचार सभेला जाताना तालुक्यातील श्री क्षेत्र पिंपळगाव येथील दत्तात्रयाचे दर्शन घेऊन मंदिराचे महंत, गोवत्स बालयोगी श्री. व्यंकट स्वामी महाराज यांचे दर्शन घेतले. राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण हे शुक्रवारी हिमायतनगर तालुक्याच्या दौऱ्यावर होते हिमायत नगरपंचायतीच्या प्रचार सभेसाठी जात असताना त्यांनी वाटेतच असलेल्या श्री क्षेत्र दत्त संस्थान पिंपळगाव येथील दत्तात्र्ययाचे दर्शन घेतले. तीर्थक्षेत्राचे महंत गोवा बालयोगी श्री व्यंकट स्वामी महाराज यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला. मागील वर्षी संपन्न झालेल्या महाशिवपुराण कथा व 108 कुंडी यज्ञ सोहळ्याप्रमाणेच यावर्षी देखील मार्च 2026 मध्ये संपन्न होणाऱ्या महाशिवपुराण कथा सोहळ्याच्या निमित्ताने घेण्यात येणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमावर चर्चा करून खासदार अशोक चव्हाण हिमायतनगर येथील प्रचारसभेला रवाना झाले.

## थोडक्यात बातम्या...



### प्रकाश नेहरकर "कृषीथॉन २०२५" पुरस्काराने सन्मानित

वडगाव कांदळी (स. गांवकरी) : येडगाव (ता.जुन्नर) येथील प्रगतिशील शेतकरी प्रकाश दादाभाऊ नेहरकर यांना नाशिक येथे आयोजित कृषीथॉन मेळाव्यात मान्यवरांच्या हस्ते कृषी क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले आहे. द्राक्षे व कृषी क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याचा गौरव म्हणून नाशिक येथे आयोजित कृषीथॉन २०२५ या भव्य कार्यक्रमात प्रकाश नेहरकर व बंधू यांना " कृषीथॉन २०२५" पुरस्कार प्रदान करण्यात आला. यामध्ये त्यांच्या दीर्घकालीन मेहनतीची, नाविन्यपूर्ण शेती पद्धतींच्या अवलंबाची आणि दर्जेदार द्राक्ष उत्पादनातील सातत्यपूर्ण योगदानाची दखल म्हणून मिळालेला हा सन्मान अत्यंत मोलाचा व अभिमानाचा आहे. यावेळी येडगाव सोसायटीचे माजी चेअरमन संतोषशेठ नेहरकर , गंगाशेठ भोर, हिराताई शेटे, मच्छिंद्र नेहरकर व सर्व नेहरकर कुटुंबीय व मान्यवर उपस्थित होते. नेहरकर बंधूनी नेहमीच आधुनिक तंत्रज्ञान, शास्त्रशुद्ध शेती, पाण्याचे संवर्धन आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन यांना प्राधान्य दिले. मेहनत, चिकाटी, पिकविविधता आणि अनुभव याद्वारे त्यांनी शेतीत मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. कृषीथॉनसारख्या राज्यस्तरीय व्यासपीठावर त्यांच्या कार्याचा गौरव झाल्याने त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### आदर्श गाव मौजे बस्ती येथे दत्त जयंती सोहळ्याला आजपासून सुरुवात



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : आदर्श गाव मौजे बस्ती येथे दत्त जयंती सोहळ्याला आज पासून सुरुवात होत आहे. सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील दत्त जयंती सोहळ्याच्या निमित्ताने महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांच्या उपस्थितीमध्ये सोहळा संपन्न होणार आहे. सकाळीच महारुद्र अभिषेक विना पूजन करून सप्ताहला सुरुवात झाली. यावर्षी या सप्ताहाच्या निमित्ताने महिलांसाठी होम मिनिस्टर,गंगा आरती,तसेच आकाश शिंदे यांचा नाथांचा आणि गुरुदेव दत्त महाराजांचा गीतांचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.असेच तसेच दररोज सात ते नऊ या वेळेत कीर्तन संपन्न झाल्यानंतर सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती रोहिदास गोरडे यांनी दिली. तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.

### एचडीएफसी बँक ठरली १ल्या क्रमांकाची संस्था; ब्रॅन्ड मुल्यांत १८ टक्क्यांची वाढ

HDFC BANK

मुंबई (स. गांवकरी) : एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँकेला देशातील सर्वाधिक मुल्यवान ब्रॅन्ड म्हणून कंतार ब्रॅन्डझ टॉप १०० मोस्ट व्हॅल्युएबल इंडियन ब्रॅन्ड्स रिपोर्ट मध्ये मानांकन प्राप्त झाले आहे. हे मुल्यांकन बँकेच्या डिजिटल नाविन्य आणि ग्राहकाभिमुख अशा योजनां विषयीच्या वचनबध्दते मुळे प्राप्त झाले आहे. एचडीएफसी बँकेची ब्रॅन्ड व्हॅल्यू ही २०२४ मध्ये ३८.३ बिलियन डॉलर्स होती ती १८ टक्क्यांनी वाढून ४४.९ बिलियन डॉलर्सवर पोहोचली आहे. २०१४ मध्ये पहिल्यांदा प्रकाशित करण्यात आलेल्या ब्रॅन्ड्स इंडिया रिपोर्ट च्या तुलनेत ३७७ टक्के इतकी आहे. बँकेला हे पहिल्या क्रमांकाचे मुल्यांकन १२ वर्षांपासून सातत्याने सुरु असलेल्या रिपोर्ट्स पैकी ८ वेळा मिळाले आहे. कंतारच्या संपादकीय लेखात ते नमूद करतात "एचडीएफसी बँकेची वाढ ही सातत्यपूर्ण नाविन्य आणि नवीन तंत्रज्ञानात गुंतवणूक करुन ग्राहकांचा अनुभव समृध्द केल्याने झाली असून यामध्ये व्हिजिल आंटी सारख्या सुपर हिरो स्टाईल व्यक्तीमत्वाचा समावेश आहे, ही व्यक्ती वापरकर्त्यांना वित्तीय फसवणूकीपासून बचाव करण्यासाठी प्रशिक्षित करते. डिजिटल बँकिंग ला वाहून घेतल्यामुळे एचडीएफसी बँक सातत्याने भारतातील ब्रॅन्ड लीडरशिप साठी नवनवीन उच्च स्तर निर्माण करते." या रँकिंग विषयी बोलतांना एचडीएफसी बँकेचे ग्रुप हेड (ब्रॅन्ड,रिटेल मार्केटिंग ॲन्ड कस्टमर ॲनेलिटिक्स) आणि चीफ मार्केटिंग ऑफिसर श्री रवी संथानम यांनी सांगितले "देशातील सर्वोत्कृष्ट ब्रॅन्ड म्हणून मान्यता मिळाल्या बद्दल आम्ही खूपच आनंदी आहोत. आमच्यासाठी आमच्या तत्वांशी खरे राहणे, ग्राहकांच्या समस्या सोडवणे आणि ग्राहकांचा अनुभव समृध्द करुन सुरक्षा आणि विश्वसनीयता निर्माण करणे हा आमचा मंत्र आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळापासून आम्ही ग्राहकांना केंद्रस्थानी ठेऊन त्या सातत्याने बदलणाऱ्या गरजांवर लक्ष केंद्रित करण्यावर मार्गक्रमण केले आहे. आमच्या मोहिमासुध्दा ग्राहकांमध्ये सुरक्षित बँकिंग पध्दतींचा प्रसार आणि जागरुकता यां विषयी तयार केल्या आहेत. या मान्यतेतून बँकेच्या कर्मचाऱ्यांचे कष्ट अधोरेखित होतात." कंतार ब्रॅन्डझ तर्फे ग्राहकाभिमुख दृष्टिकोनासह आरि्थक मुल्य (ब्रॅन्डच्या मालमत्तेला जोडलेले कॉर्पोरेट उत्पन्न) आणि ब्रॅन्डचे योगदान (मागणीची शक्ती, किंमतीची शक्ती आणि भविष्यातील शक्ती यांचे योगदान) यांचा वापर केला जातो. बँके विषयी माहिती देतांना रिपोर्ट मध्ये हे नमूद करतो "एचडीएफसी बँकेने ग्राहकाभिमुख नाविन्यांचा वापर करुन आपले ब्रॅन्ड मुल्य वाढवले आहे. अगदी पेमेंट्स पासून ते पर्सनल बँकिंग ते घर खरेदी पर्यंत, एचडीएफसी बँकेने जीवनातील पैशां विषयीची कामे ही अगदी सोपी करण्यासाठी नवनवीन मार्ग शोधले आहेत. यातील अनेक नाविन्ये ही सही आणि ब्रॅन्ड मालमत्तांशी संबंधित आहेत.

# बिलोलीच्या प्रभाग क्रमांक ९ मध्ये काँग्रेसच्या उच्चशिक्षित उमेदवारांचा बोलबाला

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



बिलोली शहरातील प्रभाग क्रमांक 9 मध्ये काँग्रेस पक्षाने अनुसूचित जातीमधून दिलेल्या महिला उमेदवार आणि सर्वसाधारण जागेवरील उमेदवार अनुक्रमे प्राध्यापक आणि अभियंता या पात्रतेची शिवाय स्थानिक ची आहेत. उच्चशिक्षित आणि मोठा जनसंपर्क या भांडवलावर हे उमेदवार मतदारांच्या पसंतीस उतरत असल्याने या प्रभागात काँग्रेसच्या या उमेदवारांचा वरचष्मा दिसतो.

बिलोली नगरपालिकेची निवडणूक 2 डिसेंबर रोजी होत आहे.या अनुषंगाने निवडणुकीचा सध्या शहरात चांगलाच माहौल बनला.चार दिवसांवर ही निवडणूक येऊन ठेपल्याने उमेदवार आपापल्या पद्धतीने मतदारांच्या गाठीभेटी घेऊन संवाद साधत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर बिलोली शहरात चर्चा होते ती प्रभाग क्रमांक 9 मधल्या काँग्रेसने दिलेल्या उच्चशिक्षित उमेदवारांची. या प्रभागातून अनुसूचित जाती प्रवर्गात महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागेवर निवडणूक लढविणाऱ्या सविता राजेंद्र कांबळे या उच्चशिक्षित आहेत.इतिहास विषयात या (एम. ए.) पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या आहेत. शिवाय त्या बी.एड आहेत. स्थानिक पातळीवर त्यांनी महिलांसाठी मोठे काम केले. प्रभागात चांगला जनसंपर्क आहे. विशेष म्हणजे त्या त्याच प्रभागात वास्तव्यास आहेत.यामुळे काँग्रेसने या बाबींचा विचार करून त्यांना उमेदवारी दिली त्यामुळे मतदारांकडून सुद्धा त्याचे स्वागत झाले.कांबळे यांच्यासोबतच सर्वसाधारण जागेवर निवडणूक लढवणारे सिद्दिकी मो. रकीब मो.वहाब हे अभियंता आहेत. पुण्याच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी येथून त्यांनी कॉम्प्युटर इंजिनिअरिंग शिक्षण पूर्ण केले असुन सध्या ते हैदराबाद येथे एआय सिनियर सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून सेवा देतात. प्रभाग क्रमांक 9 मधील या उच्चशिक्षित उमेदवारांना काँग्रेसने उमेदवारी दिली. आणि यात भरीस भर म्हणजे काँग्रेसचे च नगराध्यक्ष पदाचे उमेदवार ॲड. भरत पवार हे सुद्धा कायद्याचे अभ्यासक आहेत. असा या प्रभागात उच्चशिक्षित उमेदवारांचा तिहेरी मेळ जुळून आला. या उमेदवारांचा येथे असलेला जनसंपर्क, मतदारासोबतचा असलेला सुसंवाद यामुळे येथील प्रभागात या उमेदवारांचा सध्या बोलबाला दिसत आहे.

सौ.सविता राजेंद्र कांबळे हे समाजात कार्यात नेहमीचं हिरीरीने सहभागी असतात त्यांनी मागील पाच वर्षापासुन स्त्रियांच्या आरोग्यसाठी फिटनेस क्लबच्या माध्यमातुन आरोग्यविषयक अनेक सेबिनार घेवुन मानवी जिवनातील आरोग्याच महत्व पटवुन देण्याची मोलाची कामगीरी बजावली त्याचबरोबर रक्तदान हे श्रेष्ठदान या संकल्पनेतुन मागील अनेक वर्षापासुन ते रक्तदान करुन सामाजिक बांधीलकी जोपासतात त्याच बरोबर शहरासह परिसरातील महिला दक्षता समितीचे अध्यक्ष असल्यामुळे आत्याच्यारा संबंधी त्यांचा नेहमी पुढाकार असतो महिला अत्याचारा संदर्भात पोलिस ठाण्यात आलेल्या तक्रारी वर ते मध्यस्ती करुन महिलांना न्याय देण्याच काम केलं. कौंटुबीक वादातुन तुटत चाललेले अनेक संसार त्यांनी जुळुन आणन्याचे काम केले आहे.

# Ai+ ने "लॅपटॅब" सादर केले : एक नवीन डिव्हाइस श्रेणी

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**



भारतातील सर्वात वेगाने वाढणारा टेक ब्रँड असलेल्या Ai+ ने आज "Ai+ Laptab" ही एक नवीन स्मार्ट डिव्हाइस श्रेणी लाँच केली आहे जी लॅपटॉपची उत्पादकता आणि टॅब्लेटची पोर्टेबिलिटी एकत्र करते. भारतातील शिकणाऱ्या, निर्माते आणि व्यावसायिकांच्या संकरित पिढीसाठी डिझाइन केलेले, हे उपकरण तीन आकारांमध्ये उपलब्ध असेल: ११", १२" आणि १३" कीबोर्ड आणि स्टायलस सपोर्टसह. ते २०२६ च्या पहिल्या तिमाहीत फ्लिपकार्ट आणि Ai+ च्या रिटेल भागीदारांद्वारे देशभरात उपलब्ध असेल. हे लाँच Ai+ चा दुसरा मोठा हार्डवेअर उपक्रम आहे. यापूर्वी, Ai+ स्मार्टफोनने फक्त सहा महिन्यांत १० लाख वापरकर्त्यांचा आकडा ओलांडला होता, ज्यामुळे भारताच्या सार्वभौम तंत्रज्ञान क्षेत्रात Ai+ ची मजबूत उपस्थिती निर्माण झाली होती. Ai+ Laptab ची कल्पना सोपी आहे: एकच उपकरण जे सर्वकाही करू शकते. ऑनलाइन वर्गात उपस्थित राहण्यापासून ते प्रेझेंटेशन संपादित करण्यापर्यंत, शो पाहण्यापर्यंत आणि जाता जाता विचारमंथन करण्यापर्यंत, वापरकर्ते आता डिव्हाइस बदलल्याशिवाय किंवा प्रवाह खंडित न करता उत्पादकता आणि मनोरंजनामध्ये अखंडपणे स्विच करू शकतील.

# मोटर सायकल चोरास शिताफीने पकडून मुद्देमालासह अटक

■ रावेर पोलिसांची कामगिरी

**रावेर : (समर्थ गांवकरी)**




गेल्या अनेक दिवसा पासून रावेर परिसरात मोटर सायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. यामुळे पोलिसांची डोकेदुखी वाढली असल्याने , यातिल फिर्यादी गजानन मधुकर विखे रा . डाकवाडी राजापुर बुरहाणपुर मध्ये प्रदेश हे त्यांचे मावस भावाचे लग्न असल्या कारणाने साकेगांव येथे गेले होते . लग्नसमारंभ आटोपुन ते त्यांच्या एक महीन्या आधी घेतलेल्या ज्युपीटर स्कुटीने सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास परतीच्या प्रवासात निघाले असतांना रावेर शहरातील पारश्या नाल्याजवळ शौचास गेले असतांना परत आल्यावर त्यांची मोटर सायकल चोरीस गेल्याचे त्यांचे लक्षात आल्याने ,रावेर पोलिस स्टेशन ला गुन्हा दाखल होता .

सदर गुन्हा दाखल होताच गुन्ह्याचा एकंदर तपासात मा पोलिस निरीक्षक सो यांनी रावेर गुन्हे शोध पथकास सुचना दिल्यावरुन आरोपीताच्या शोधास संपर्ण भागातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले तसेच गुप्त बातमीदारा व्दारे माहीती घेण्याचा प्रयत्न करण्यात आल्यावरुन आरोपीताची ओळख पटविण्यात पोलिसांना यश आले . व आरोपी नामे उबेद वेग शब्बीर वेग लोहार वय.२६ रा . मिल्लत नगर फैजपुर ता . यावल यावी सीसीटीव्ही फुटेज च्या आधारे ओळख पटवुन विश्वासात घेवुन

विच्यारपुस केली असता त्याने गुन्हयाची कबुली देत गुन्हयातील मोटार सायकल त्याच्या ताब्यातुन हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे . आरोपीताकडुन अजुन गुन्हे घडले आहे काय या बाबत पुढील तपास चालु आहे .

सदर गुन्हयात आरोपीताला अटक करुन मा न्यायालयात दोन दिवसांची पोलिस कोठडीची मागणी करण्यात आली आहे .

सदर कार्यवाही ही मा श्री महेश्वर रेडडी सो पोलिस अधिक्षक जळगांव मा श्री अशोक नखाते सो अप्पर पो अधिक्षक जळगांव विभाग मा श्री अनिल बडगुजर सो पोलिस उपअधिक्षक फैजपुर विभाग यांच्या मार्गदर्शनाने पोलिस स्टेशन सवेर मधील डॉ विशाल जयस्वाल गुन्हे शोध पथकातील नितीन आमोदकर कल्पेश आमोदकर विशाल पाटील प्रमोद पाटील श्रीकांत चव्हाण सुकेश तडवी भुषण सपकाळे यांनी आरोपीताचा शोध घेतला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहेकों हमीद तडवी हे करीत आहेत.

# एनआयआरडीसी ने 'इनडॲप' विकसित केले

■ एमएसएमई क्षेत्रासाठी हे भारताचे 'अलिबाबा' ठरण्याची शक्यता

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



उद्योजकांना संपूर्ण भारतात नेटवर्किंग सुलभ करण्यासाठी, व्यापारात मदत करण्यासाठी आणि सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी एक 'सिंगल-विंडो प्लॅटफॉर्म' म्हणून याची रचना केली गेली आहे राष्ट्रीय उद्योग संशोधन आणि विकास परिषदेने (एनआयआरडीसी) एमएसएमई (एमएसएमई) क्षेत्रातील सहभाग आणि पोहोच वाढवण्यासाठी 'इनडॲप' (इनडॲप) नावाच्या एका स्वदेशी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या विकासाची घोषणा केली. हे राष्ट्रव्यापी बीटूबी बाजारपेठ भारतीय ब्रँड्सना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक बनवणे, भारतीय कारागीर आणि हस्तकलाकारांना जागतिक स्तरावर ओळख मिळवून देणे आणि एमएसएमईंना 'विकसित भारत' च्या दृष्टीकोनात योगदान देण्यास सक्षम करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले आहे. आठ मंत्रालयांच्या पाठिंब्याने, हे विशेषतः संपूर्ण भारतातील एमएसएमई क्षेत्रातील उद्योजकांसाठी तयार केले गेले आहे.या प्लॅटफॉर्मचे फायदे खूप व्यापक आहेत. सरकारी योजनांची माहिती पुरवण्यापासून आणि भांडवलाचा लाभ घेण्यास मदत करण्यापासून ते व्यवसायाची दृश्यमानता वाढवणे आणि प्रशिक्षण व क्षमता बांधणीमध्ये मदत करण्यापर्यंत, 'इनडॲप' एका क्लिकवर एमएसएमईसाठी डिजिटल सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा करते.

# एसुस बनली भारतातील नंबर २ कंझ्युमर नोटबुक कंपनी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

तैवानी तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनी एसुसने २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत भारतातील नंबर २ कंझ्युमर नोटबुक कंपनी म्हणून आपले स्थान मजबूत केले आहे, असे IDC क्वार्टरली पर्सनल कॉम्प्युटिंग डिव्हाइस ट्रॅकर, २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीनुसार म्हटले आहे.

ASUS GLOBAL

हा टप्पा एसुसच्या उल्लेखनीय वर्षानुवर्षे (YoY) वाढीला अधोरेखित करतो, जो भारतातील ६००+ हून अधिक जिल्ह्यांमध्ये उत्पादन अनुभव वाढवण्यासाठी त्यांचे उत्पादन पोर्टफोलिओ लक्षणीयरीत्या वाढवून ग्राहकांच्या जवळ जाण्यावर धोरणात्मक लक्ष केंद्रित करून चालवला जातो.

# नगदवाडी केंद्रशाळेत कला क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा उत्साहात संपन्न

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**



नगदवाडी (ता.जुन्नर ) येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेत यशवंतराव चव्हाण कला क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा उत्साहात पार पडल्या अशी माहिती नगदवाडी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश बढे यांनी दिली. केंद्रस्तरीय स्पर्धांच्या निमित्ताने केंद्रातील नगदवाडी,वडगाव,१४ नंबर ,वडगाव कांदळी,भोरवाडी,सुतारठिके व मोकसबाग या शाळांतील विद्यार्थी स्पर्धकांनी खो-खो,लंगडी,कबड्डी, लोकनृत्य,लेझीम,भजन, कविता गायन,वक्तृत्व,धावणे,लांबउडी ,उंचउडी,गोळाफेक,थाळीफेक, बुद्धिबळ,प्रश्नमंजुषा,वेशभूषा आदि विविध स्पर्धांत सहभाग घेऊन स्पर्धांचा आनंद घेत यश संपादन केले. सर्व यशस्वी स्पर्धकांना सन्मानचिन्ह(ट्रॉफीज् ),मेडल व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.यासाठी यशोदिप सहकारी पतपेढी मुंबईचे अध्यक्ष रोहिदास बढे,वेदिका मसाले उत्पादक गणेश दुरगुडे,गुरुप्रसाद पापड मल्टिंग मसाला क्रश उद्योग समूहाच्या सिमा दुरगुडे,केंद्रप्रमुख वनिता हांडे,केंद्र शाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला बोऱ्हाडे यांचे आर्थिक सहकार्य लाभले.

स्पर्धांच्या निमित्ताने ग्रामपंचायत सदस्य नंदा बढे,अनिलबापू भोर,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश बढे,शाळा सल्लागार समिती अध्यक्ष सुरेश बढे,उपाध्यक्ष शिवशंकर मांडे,सदस्य तानाजी बढे,दिनेश कुतळ,दयानंद बढे,संगिताताई बढे,अक्षदा जाधव,शरद पाचपुते,गणेश कुतळ,सुभाष बढे,बंटी नायडू,गणेश भोर,पिराजी भोर आदी मान्यवर,ग्रामस्थ,मार्गदर्शक शिक्षक,पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धांचे नियोजन नगदवाडी केंद्राच्या केंद्रप्रमुख वनिता हांडे, मुख्याध्यापिका उज्वला बोऱ्हाडे,शिक्षक मंगेश मेहेर,पंडित चौगुले,निलेश शेलार,विद्या वाघ, सुप्रिया अभंग,आशा आरेकर, उज्वला कांबळे व नगदवाडी केंद्रातील शिक्षकांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश मेहेर यांनी केले तर आभार निलेश शेलार यांनी मानले.

# रिपब्लिकन पक्षाच्या मुंबई प्रदेशच्या मेळाव्यात शक्तीप्रदर्शन घडवा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन पक्षाचा मुंबई प्रदेशचा भव्य मेळावा येत्या रविवार दि.30 नोंव्हेबर रोजी मुंबईत चेंबुर येथील गांधी मैदानात आयोजित करण्यात आलेला आहे.या मेळाव्यात कार्यकर्त्यानी रिपब्लिकन पक्षाचे शक्ती प्रदर्शन घडवावे असे आवाहन 7 रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस गौतम सोनावणे यांनी केले.

रिपब्लिकन पक्षाच्या विक्रोळी तालुक्याच्या वतीने आयोजित बैठकीत गौतम सोनावणे बोलत होते.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड,महिला आघाडीच्या मुंबई प्रदेश अध्यक्षा उषाताई रामळु,महिला आघाडीच्या मुंबई उपाध्यक्षा नैनाताई वैराट,पवई विभागाचे नेते बाळ गरुड,विक्रोळी तालुका अध्यक्ष राजेश सरकार,महिला आघाडीच्या नेत्या सोमा राजेश सरकार,मिना पवार,चंद्रशेखर कांबळे,जिल्हाध्यक्ष अजित रणदिवे,शिलाताई गांगुर्डे,अनिल गांगुर्डे, दादासाहेब झेंडे; ; हेमंत रणपिसे; शांतीलाल बोरुडे ; वॉर्ड अध्यक्ष अजय लगाडे आदि अनेक मान्यवर उपस्थित होते. या वेळी अनेक कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला.

येत्या रविवारी 30 नोव्हेंबर रोजी चेंबुरच्या गांधी मैदानात आयोजित केलेल्या मुंबई प्रदेश मेळाव्यात रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सामील झाले पाहिजे.मेळाव्याच्या पुर्व तयारीसाठी विक्रोळी तालुक्या च्या वतीने रिपब्लिकन कार्यकर्त्यांची महत्वपूर्ण बैठक अत्रिया हॉल सूर्य नगर येथे आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. मोठ्या संख्येने मुंबई प्रदेश रिपाइं च्या मेळाव्यात सहभागी होण्याचा सर्वांनी निर्धार केला. विक्रोळी तालुक्यात मुंबई महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र 120 हा खुला प्रवर्ग असुन या प्रवर्गात यापुर्वी 2017 च्या निवडणुकित रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवार सोमाताई राजेश सरकार यांनी भरघोस मते मिळाली.

मात्र थोड्या मताने त्यांचा पराभव झाला. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत सोमा राजेश सरकार यांचा विजय निश्चीत होईल.



वाशिम : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष व तरुण कांति मंच जिल्हाध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षण व व्यायाम प्रसारक मंडळ धनज बु चे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी यांनी मातोश्री स्वर्गीय स्नेहलता पूनमचंद सोमानी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये 51 हजार रुपयांचा धनादेश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्द केला. नगरपालिका निवडणूक प्रचाराकरिता वाशीम येथे आले असता मंचावर निलेश सोमानी यांनी राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांना धनादेश सुपूर्द केला यावेळी वाशिम मंगरूळपीर आमदार शाम खोडे, कारंजा विधानसभा आमदार सई डहाके, खासदार अनुप धोत्रे, भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, भाजपा नेते राजू पाटील राजे, आमदार गोरखे, आमदार बाबूसिंग नाईक समवेत मान्यवर उपस्थित होते. यापूर्वी सोमानी यांनी विविध सामाजिक संस्था व कार्याला मदत केलेली आहे यावेळी मुख्यमंत्री यांना सोमानी यांनी स्वतः लिहिलेले मेरा देश बदल रहा है हे पुस्तक भेट दिले.

## थोडक्यात बातम्या...



### अमृतवाहिनी सह. बँकेची ११३० कोटींची उलाढाल : माजी मंत्री बाळासाहेब थोरात

संगमनेर (स. गांवकरी) : आपण अनेक अडचणीवर मात करून निळवंडे धरण पूर्ण केले या धरणामुळे पुढील अनेक पिढ्या समृद्ध होणार आहे. धरणातून शहरासाठी थेट पाईपलाईन योजना आली. विकासाची कामे केली या पाठीमागे कोणीतरी राबतो आहे याची जाणीव ठेवली पाहिजे. सहकारी संस्थांमुळे तालुक्याची अर्थव्यवस्था बळकट झाली असून अमृतवाहिनी बँकेने 1130 कोटींची उलाढाल केली आहे. ही सर्व वाटचाल जपण्याची आपली जबाबदारी असून तालुक्यात वाढलेल्या व येऊ पाहणाऱ्या वाईट प्रवृत्ती वेळीच रोखा असे आवाहन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. संगमनेर खुर्द येथे सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन व शेतकरी बोलत होते यावेळी अध्यक्षस्थानी मा आ.डॉ. सुधीर तांबे होते तर व्यासपीठावर चेअरमन सुधाकर जोशी, पारनेरचे काँग्रेस तालुकाध्यक्ष संभाजी रोहकले, अॅड माधवराव कानवडे, लहान भाऊ पा गुंजाळ, पांडुरंग पा. घुले, डॉ.जयश्रीताई थोरात, शंकरराव खेमनर, संपतराव डोंगरे, बापूसाहेब टाक, रामहरी कातोरे, रामदास पा. वाघ, गणपतराव सांगळे, विष्णुपंत रहाटळ, के.के. थोरात, चेअरमन अॅड. नानासाहेब शिंदे, उपसरपंच गणेश सुपेकर ,सौ. अर्चनाताई बालोडे, श्रीमती रोहिणी गुंजाळ, सुभाष पाटील गुंजाळ संचालक अॅड लक्ष्मण खेमनर अण्णासाहेब शिंदे, राजू गुंजाळ, बापूसाहेब गिरी, श्रीमती ललिता दिघे, विवेक तांबे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराती आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

### भक्तीचा महापूर; हजारो भाविकांच्या उपस्थितीत भव्य महाआरती व महाप्रसाद

पारनेर तालुका (स. गांवकरी) : गुरुवार दिनांक 27 नोव्हेंबर 2025 रोजी रांधे येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात आयोजित महाआरती आणि महाप्रसादाचा कार्यक्रम अत्यंत भक्तिभावाने, शिस्तिमधे आणि आध्यात्मिक उर्जेने संपन्न झाला. प्रत्येक गुरुवारी होत असलेला हा सोहळा आता हजारो भाविकांसाठी श्रद्धेचा आधार आणि आध्यात्मिक शक्तीचा स्रोत बनला आहे. भक्तिभावाने भारलेला संध्याकाळचा क्रम 7.45 ते 8.15 सामूहिक स्वामी नामजप, 8.35 — भव्य व भक्तिसमाधीरूप महाआरती,महाआरतीनंतर स्वामी महती व मार्गदर्शन आणि शेवटी महाप्रसाद सेवा. महाप्रसाद सेवा सेवेकरी बाबा पडवळ, विठ्ठल मावळे, पिनू मावळे, प्रभाकर खैरे, प्रशांत खैरे,अक्षय खैरे,सागर पडवळ,राहुल लाळगे, हरिभाऊ कापसे, देवराज शेंडकर, स्वप्निल मावळे, राहुल बा लाळगे, मनोज लोणकर, यश पोखरकर, अविनाश लाळगे, आकाश लाळगे, दीपक मावळे,डॉ. सुभाष मावळे, कैलास शेटे, ओंकार लाळगे, मोहन कामठे, किसन गायकवाड, संतोष मापारी, गणेश चासकर, विलास चासकर, जालिंदर लाळगे, वैजनाथ पडवळ, विशाल खैरे, राम कामठे, धनंजय लाळगे, रामकृष्ण मावळे, विकास शेळके, पांडुरंग य शेंडकर, संतोष नरसाळे, बाळासाहेब नरसाळे, तसेच प्रत्येक गुरुवारी 12 ही महिने साई संतोषी एक्वा (अळकुटी) तर्फे मोफत पाणी जार सौजन्य, महालक्ष्मी ऍग्रो, रांधे फाटा यांच्या वतीने 12 महिने दिवा तेल याचप्रमाणे अनेक भाविक सहकार्य करत असताना दिसतात. महाप्रसाद वाढण्यासाठी अनेक युवा वर्ग आणि महिला या ठिकाणी आवर्जून सेवा करताना दिसून येतात. महाआरती दरम्यान संपूर्ण परिसरात स्वामींचा जय जय कार आणि "दिगंबरा, दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" या घोषणांनी वातावरण दणाणून गेले.दर्शना दरम्यान अनेक भाविकांच्या डोळ्यातून आनंदाश्रू अनावर झाले.

# ठक्कर परिवाराचा प्रेरणादायी वाढदिवस संकल्प

## स्वेटर-चादर वाटप कार्यक्रम, तरुणांसाठी मार्गदर्शन आणि समाजसेवेचा नवा आदर्श!

■ डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



एन.के.टी. ग्रुपचे मॅनेजिंग ट्रस्टी परेशभाई नानजीभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त यंदा भव्य कार्यक्रमाची नव्हे तर समाजोपयोगी उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. ठाणे शहर, ग्रामीण भाग तसेच महाराष्ट्रातील गरजू नागरिकांना मदतीचा हात देताना थंडीच्या पार्श्वभूमीवर स्वेटर व चादर वाटपाचा संकल्प त्यांनी पुढे नेला.

वाढदिवसाचा दिवस खर्ची घालवण्यापेक्षा समाजसेवेच्या दिशेने पाऊल टाकणे हेच खरे आनंदाचे कारण आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला.

परेशभाईंच्या व्यक्तिमत्त्वात शिक्षण, शैक्षणिक धोरण, सामाजिक कार्य आणि मानवता यांची अनोखी सांगड आहे. त्यांच्या सामाजिक विचारांना बळ मिळाले ते त्यांच्या वडिलांकडून. वडिलांनी आयुष्यभर संपूर्ण देशासाठी घराचे दरवाजे 365 दिवस उघडे ठेवले. कोणतीही व्यक्ती मदतीशिवाय त्यांच्या दारातून परत गेली नाही. मुलांनी समाजासाठी केलेल्या दानधर्माला त्यांनी कधीच विरोध केला नाही— हाच वारसा आज ठक्कर परिवार पुढे नेत आहे.

आईचे आशीर्वाद, भावाची साथ, बहिणींचे प्रेम आणि कुटुंबातील नैतिक मूल्ये यांच्या जोरावर परेशभाईंनी सामाजिक कार्य अधिक प्रभावीपणे रूजवले.

त्यांच्या मते, "देव हा मंदिरात नसून माणसात आहे. पैसे देण्यापेक्षा गरजूंना साहित्य देणे अधिक परिणामकारक असते; कारण अशी मदत त्या कुटुंबाच्या मनात आयुष्यभर राहते."

एन.के.टी. ग्रुप: शिक्षणासह समाजकार्यात देशभरात अग्रणी!

आज एन.के.टी. ग्रुप हा केवळ एक शैक्षणिक संस्थाच राहिलेला नाही, तर सेवा, दान, समाजकार्यातील अग्रणी संस्था म्हणून हिंदुस्तानभर मान्यता पावलेली आहे.

ठक्कर परिवारात दररोज दिवाळीसारखे वातावरण असते, मात्र या कुटुंबाचा ठाम विश्वास असा की – "आपला आनंद समाजाबरोबर वाटला, तरच दिवाळी पूर्ण होते."

अनेक जण समाजकार्यात निवडणुका जवळ आल्या की समाजकार्य दाखवत असतात. मात्र ठक्कर परिवार वर्षातील 365 दिवस निस्वार्थ सेवा हेच आपल्या कर्तव्य मानतो. ही सातत्याची सेवा आज समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

तरुणांसाठी थेट संदेश: "मोबाईलचे व्यसन सर्वात घातक"

वाढदिवसाच्या या विशेष उपक्रमादरम्यान परेशभाईंनी तरुण पिढीसाठी अत्यंत महत्वाचे मार्गदर्शन केले.

त्यांनी स्पष्ट सांगितले :"मोबाईल, फेसबुक, व्हॉट्सअॅपमध्ये डोके खुपसून बसू नका. हे व्यसन दारूपेक्षाही घातक आहे. मोबाईल फक्त संवादासाठी वापरा, जीवनाचा आधार बनवू नका."

त्यांनी तरुणांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टीकोन आणि ध्येयवादाने पाहण्यास प्रवृत्त केले. "जिद्द, चिकाटी आणि मेहनत, या तीन गोष्टी तुम्हाला नक्की यश देतात. तुमची आयुष्याची शिल्पे तुम्हीच घडवा. जीवन सुंदर आहे, त्याचा आनंद घ्या, त्याला योग्य दिशा द्या."

### महाराष्ट्र संतभूमी – प्रेरणेचा आधार!

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. येथे जन्मलेल्या रत्नांनी देशाला दिशा दिली, असे सांगून त्यांनी समाजातील वंचित घटकांना मदत करण्याचे व्रत हेच खरे समाजसुधारकाचे काम असल्याचे नमूद केले. त्यांच्या मते, "समाज बदलायचा असेल तर प्रेम, मदत आणि सेवा हीच खरी साधना आहे."

### वाढदिवसाला नवा अर्थ: सेवा, दान आणि प्रेरणा!

परेशभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त घेतलेला हा समाजोपयोगी संकल्प अनेकांसाठी आदर्श ठरत आहे. गरजूंसाठी स्वेटर-चादर वाटप, समाजासाठी दानधर्म, तरुणांसाठी प्रेरणा आणि मानवतेचा दीप पेटवत हा वाढदिवस एक वेगळाच संदेश घेऊन समाजासमोर उभा राहिला. त्यांच्या या कार्यामुळे वाढदिवस म्हणजे केवळ आनंदोत्सव नव्हे, तर समाजसेवेची नवी प्रेरणा असा संदेश सर्वदूर पोहोचला आहे.

# कारकिर्दीच्या यशस्वीतेत टीम वर्क महत्वाचे

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र हा माझ्या रक्तात, स्वभावात आणि आचरणात असून कोणत्याही पदावर यशस्वी होण्यासाठी माती आणि संस्कृतीशी एकरुप होणे गरजेचे आहे. आपल्या भारतीय प्रशासकीय सेवेच्या कारकिर्दीत सहकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबतचे टीम वर्क महत्त्वाचे ठरल्याची भावना मुख्य सचिव राजेश कुमार यांनी व्यक्त केली.

मुख्य सचिव राजेश कुमार 30 नोव्हेंबर 2025 रोजी सेवानिवृत्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागामार्फत त्यांचा सेवापूर्ती समारंभ मंत्रालयात आयोजित करण्यात आला. यावेळी सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय अधिकारी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती अधिकारी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ, आयएएस अधिकारी संघटना यांच्यावतीने त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# गोवर्धन इकोविलेज आणि सिम्बायोसिस स्कूल ऑफ कुलिनरी आर्ट्स अँड न्यूट्रिशनल सायन्सेस यांच्याकडून स्वदेशी पाककला स्पर्धेचे आयोजन

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

गोवर्धन इकोव्हिलेज (GEV), सिम्बायोसिस स्कूल ऑफ कुलिनरी आर्ट्स अँड न्यूट्रिशनल सायन्सेस (SSCANS), जे शेट्टी फिलांथ्रॉपी आणि गोवर्धन स्कूल ऑफ कुलिनरी आर्ट्स – द ईशिता डे सेंटर फॉर सात्त्विक कुकिंग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावरील स्वदेशी पाककला स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. ही स्पर्धा Native Food Matters Initiative अंतर्गत आयोजित करण्यात येत असून, भारताच्या प्राचीन खाद्य वारशाचा गौरव करण्यासोबतच भोजनाच्या माध्यमातून सतत विकास लक्ष्य (SDGs) – शून्य भूख आणि उत्तम आरोग्य यांना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट साध्य करते.

या स्पर्धेत सहभागींसाठी सात्त्विक, पूर्ण शाकाहारी आणि कांदा-लसूण विरहित पाककृती तयार करणे अनिवार्य आहे. पाककृतींचा आधार कुल्थी (Horsegram), रताळे (Purple Yam) आणि महुआ फुले या तीन स्वदेशी व पोषणमूल्यांनी समृद्ध घटकांवर असेल. हा उपक्रम SSCANS आणि GEV यांच्या स्वदेशी खाद्य संशोधन आणि समुदाय-आधारित पोषण जनजागृती या सातत्यपूर्ण प्रयत्नांवर आधारित असून, स्थानिक अन्नपदार्थांचे सांस्कृतिक, पोषणीय आणि शाश्वत मूल्य ठळकपणे अधोरेखित करतो.

ही स्पर्धा गृहिणी, स्वयं-साहाय्य गट (SHGs), विद्यार्थी, शेफ, पोषणतज्ज्ञ आणि फूड प्रोफेशनल्स यांच्यासाठी खुली आहे. पाककृती प्रवेशिका २७ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर या कालावधीत स्वीकारल्या जातील. त्यानंतर डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात SSCANS येथे लाईव्ह कुक-ऑफचे आयोजन करण्यात येईल व सर्वोत्कृष्ट विजेत्यांना पारितोषिके प्रदान केली जातील.

प्रथम तीन स्थान प्राप्त स्पर्धकांचा सन्मान ३० डिसेंबर रोजी GEV, पालघर येथे आयोजित Native Food Matters कार्यक्रमात विशेषरूपाने करण्यात येईल. अधिक माहितीसाठी ईमेल करा: activities@ssca.edu.in

# चांगल्या कामासाठी मदत मागा; दानशूर सढळ हाताने देतात : डॉ. सदानंद मोरे

■ दिवाळीच्या सुटीत विद्यार्थ्यांनी संकलित केलेला निधी संस्थेकडे सुपूर्त

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

"चांगल्या कामासाठी निधी संकलन सामाजिक अभिसरणाचा महत्वपूर्ण घटक आहे. संस्थेच्या कार्याला पुढे घेऊन जाणारा हा उपक्रम कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी देतो. त्यामुळे चांगल्या कामासाठी मदत मागायला कधीही लाजू नका. निर्मळ मनाने मागितलेली मदत सढळ हाताने देणारे दानशूर समाजात आहेत," असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी केले. सामाजिक जाणिवेतून दिवाळी सुटीत आपल्या गावी आणि परिसरात संस्थेसाठी संकलित केलेला निधी विद्यार्थ्यांनी विद्यार्थी साहाय्यक समितीकडे सुपूर्त केला. समितीमधील १३०० विद्यार्थ्यांनी जवळपास २५ लाखांचा निधी संकलित केला आहे.




संस्थेच्या आपटे वसतिगृहातील मोडक सभागृहात आयोजित कार्यक्रमात समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, कायम विश्वस्त तुकाराम गायकवाड, सहाय्य संकलन उपसमितीचे अध्यक्ष प्रदीप मांडके, वसतिगृह उपसमिती अध्यक्ष दिनकर वैद्य, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी व मुख्य कार्यपालन अधिकारी दुर्गेश पवार आदी उपस्थित होते. डॉ. सदानंद मोरे म्हणाले, "समाज घडवणाऱ्या डेक्कन कॉलेज, गोखले इन्स्टिट्यूट, भारत इतिहास संशोधक मंडळ, भांडारकर इन्स्टिट्यूट याप्रमाणेच विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्य आहे. या संस्था महाराष्ट्राचे भूषण आहेत. शिक्षण, संस्कार आणि सामाजिक संवेदनशीलता रुजवण्याचे काम विद्यार्थी साहाय्यक समिती करते आहे. त्यातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. महाराष्ट्रातील लोकांमध्ये दानत आहे. चांगल्या कामासाठी लोक सढळ हाताने मदत करतात. आपले काम तेवढ्या तळमळीने आणि प्रामाणिकपणे लोकांपर्यंत पोहोचायला हवे."

तुषार रंजनकर म्हणाले, "गेल्या ४० वर्षापासून हा उपक्रम सुरू आहे. समितीचे काम गावागावात पोहोचावे, तसेच निधी संकलन व्हावे, या उद्देशाने होणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव अधिक दृढ करतो. देणारे हात असंख्य आहेत, आपण त्यांच्यापर्यंत पोहोचण्याची गरज असते."

# हंगामा ओटीटीने ऑरिजिनल्ससह आपली कंटेंट स्लेट अधिक मजबूत केली

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**




भारतातील आघाडीच्या डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटीने 2025 मध्ये सर्वात वेगाने वाढणाऱ्या हिंदी भाषिक ओटीटी प्लॅटफॉर्म म्हणून आपली ओळख अधिक मजबूत केली. या वर्षी प्लॅटफॉर्मने थ्रिलर, क्राईम ड्रामा, सायकोलॉजिकल कथानक आणि बोल्ड नॅरेटिव्हजचा दमदार संच सादर केला. छोट्या गावातील रहस्यांपासून ते उच्चभ्रू समाजातील मनाचे खेळ, विविध कथा सांगण्याची हंगामा ओटीटीची ओळख यावर्षी आणखी बळकट झाली. नवीन चेहरे, प्रभावी अभिनय आणि यूनिकली इंडियन कथा यामुळे प्लॅटफॉर्मने प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

खाली 2025 मध्ये हंगामा ओटीटीवर आलेल्या प्रमुख ऑरिजिनल्सची माहिती दिली आहे:

पर्सनल ट्रेनर – जानेवारी 2025

मुंबईच्या एलिट जिम कल्चरमध्ये घडणारी ही कथा टीना दत्ता यांच्या नेतृत्वातील एक डार्क आणि रोमांचक थ्रिलर आहे. मालिकेत नेहा ही विवाहित स्त्री आहे, जी आपल्या ट्रेनरसोबतच्या नात्यात गुंतत जाते आणि त्याच्या रहस्यमय मृत्यूनंतर फसवणूक, इच्छा आणि धोक्यांच्या जाळ्यात अडकते. गुलशन नैन आणि साहिब टागरा यांनी या वेगवान थ्रिलरमध्ये दमदार अभिनय केला आहे.

पती पत्नी और पडोसन – फेब्रुवारी 2025

एका लहान शहरातील सायकोलॉजिकल क्राईम ड्रामामध्ये युक्ती कपूर यांनी साकारलेली प्रतिभा आपल्या नवीन शेजारी सागरिका विषयी अनावर आकर्षण अनुभवते. तिच्या आयुष्यातील जुन्या गुपितांमुळे एक धोकादायक खेळ सुरू होतो. मोहित जोशी आणि चारू मेहरा यांच्या प्रभावी अभिनयासह ही मालिका ऑब्सेशन ,डिसेप्शन आणि मानवी गुंतागुंत यांचा वेध घेते.

कब क्यूं और कहां (एवरु इप्पुडू एकादा) – मार्च 2025

बेरहमीने झालेल्या काही हत्यांची मालिका सीबीआय च्या मोठ्या तपासाला सुरुवात करून देते. संशय एका प्रभावशाली उद्योजक विक्रम वर्मावर जात असताना नवनवीन खुलास्यांमुळे सत्य अधिक गुंतागुंतीचे बनते. धन्या बालकृष्णन, आशु रेड्डी आणि कौशल मंदा यांच्या ताकदीच्या अभिनयामुळे ही मालिका डिसेप्शन,ब्लॅकमेल आणि अनपेक्षित ट्विस्टसाठी ओळखली जाते.

खदान – मार्च 2025

एका खाणकामाच्या गावात घडणारी ही हौटिंग थ्रिलर आहे. अली गोनी यांनी साकारलेले इन्स्पेक्टर वीर प्रताप सिंग स्थानिक लोककथांशी, शापांशी आणि गाडलेल्या गुपितांशी निगडित हत्या उलगडतात. करणवीर बोहरा आणि रेबेका आनंद यांच्या भूमिकांनी कथेला अधिक खोली मिळते.

हसरते 2 – एप्रिल 2025

प्रचंड यश मिळालेल्या पहिल्या सीजननंतर हंगामाची सर्वाधिक पाहिली जाणारी ऑरिजिनल मालिका पुन्हा परतली. महिलांच्या इच्छा, ओळख आणि अंतर्मनाचा शोध घेणाऱ्या सहा प्रभावशाली कथा या सीजनमध्ये आहेत. गुल्की जोशी, विवेक दहिया, नायरा एम बॅनर्जी, पूजा बॅनर्जी, आकांक्षा पुरी, परम सिंग, डॉली चावला आणि इतर मोठ्या कलाकारांच्या अभिनयाने हा सीजन पुन्हा एकदा चर्चेत आला.

पूछताछ खोलीत घडणारी एक सायकोलॉजिकल थ्रिलर. सृष्टी रोडे यांनी साकारलेली मोना अनेक हत्यांची प्रमुख संशयित आहे. तिच्या कथांनी इन्स्पेक्टर पवन (अंकुर नय्यर) एक धोकादायक मानसिक खेळात अडकतो. डेझी बोपण्णा देखील महत्त्वाच्या भूमिकेत आहे.

जुडवा जाल – जून 2025

एक दमदार सहा भागांची हूडुनिट मालिका. मोनालिसा यांनी जुळ्या बहिणींची ड्युअल भूमिका साकारली आहे. अनामिका च्या संशयास्पद मृत्यूच्या तपासादरम्यान इन्स्पेक्टर कुणाल समोर प्रत्येक टप्प्यावर नवे रहस्य उलगडते.

मुंबईच्या अंडरवर्ल्डमध्ये घडणारा एक ग्रिटी क्राईम ड्रामा. दिव्या अग्रवाल यांनी साकारलेली उर्वशी राजे गुन्हेगारी जगतातील स्वतःचे साम्राज्य उभे करते. अंकित गेरा आणि अक्षय डोगरा यांच्या भूमिकांसह ही मालिका पावर ,सर्वाइवल आणि एम्बिशन ची अनोखी कथा सांगते.